MAHMARI 19358/13/1/2000 - TC

प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः
विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष विसावे / अंक ७ / जुलै २०१९

## संपादकीय

### राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९

भारताच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा मसुदा नुकताच सरकारला सादर करण्यात आलेला आहे. शासकीय निर्णयानुसार भारतीय शिक्षणाचा सांगोपांग विचार करून तिच्या सुधारणेसाठी मार्गदर्शक तत्त्वे सुचविण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. भारतीय अवकाश संस्थचे निवृत्त अध्यक्ष डॉ. कस्तुरिरंगन या समितीचे अध्यक्ष होते. या समितीने ४८४ पानांचा एक सविस्तर मसुदा सरकारला सादर केला. त्यावर वेगवेगळ्या ठिकाणी चर्चा घडवून आणण्यात येत आहेत. तसेच लोकांकडून मते मागविण्यात येत आहेत. या सूचनांचा समावेश करून अंतिम धोरण ठरविण्यात येईल. या मसुद्यात काय सांगितले आहे हे समजून घेण्यापूर्वी भारतीय शिक्षणाची वाटचाल कशी झाली हे समजून घेणे महत्त्वाचे ठरेल.

१९४७ साली देश स्वतंत्र झाला तेव्हा आपल्यापुढे दोन पर्याय उपलब्ध होते. एकतर इंग्रजांनी बसविलेली शिक्षणाची घडी तशीच चालू ठेवणे आणि जास्तीत जास्त मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे. दुसरा पर्याय होता तो शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल करणे आणि भारतीय समाजाच्या विकासासाठी योग्य अशी शिक्षण प्रणाली लागू करणे. त्यावेळच्या निर्णय कर्त्यांनी पहिला पर्याय स्वीकारला आणि संख्यात्मक वृद्धीवर भर दिला. सरकारने खेड्यापाड्यांत नवीन शाळा काढल्या. त्याचबरोबर खाजगी संस्थांना शाळा काढण्यासाठी उत्तेजन दिले. त्यातील काही अनुदानित तर काही विना अनुदानित होत्या. याचा फायदा असा झाला की, शिक्षणाच्या सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कितीतरी पटीने वाढली.

शिक्षणाच्या संख्यात्मक विकासाबरोबरच गुणात्मक विकासाचाही सरकारने वेळोवेळी प्रयत्न केला आहे. १९४८ साली केंद्र सरकारने मुदलियार समितीची स्थापना केली. या समितीने राष्ट्रीय प्रगतीत विज्ञानाचे महत्त्व लक्षात घेऊन शालेय स्तरावर सामान्य विज्ञान शिकविले जावे, तसेच विज्ञानाचे उच्च शिक्षण देण्यासाठी विज्ञान महाविद्यालये स्थापन करावीत असे सुचवले. त्यानंतर शिक्षणाचा विचार पुन्हा एकदा १९६० च्या दशकात करण्यात आला.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

केंद्र सरकारने १९६४ साली कोठारी आयोगाची स्थापना केली. दोन वर्षांनंतर या आयोगाने आपला सविस्तर अहवाल सादर केला. याच आयोगाने १०+२+३ हे सूत्र सुचवले. त्याचबरोबर विज्ञान आणि गणित हे दोन विषय शालेय शिक्षणात अनिवार्य केले.


दोन दशकानंतर म्हणजे १९८४ साली पुन्हा एकदा भारतीय शिक्षणाचा विचार करण्यात आला. त्यावेळी नेमलेल्या समितीने नवीन शिक्षण आराखडा सादर केला. यात अनेक महत्त्वपूर्ण बदल सुचविण्यात आले होते. त्यापैकी एक बदल होता एकात्मिक अध्यापनासंबंधी. विषय घटकांच्या सिमारेषा अगदी स्पष्ट दिसतील अशा पद्धतीने चालणारे शिक्षण बदलून ते एकत्रितपणे शिकविले जावे असे या मसुद्यात सांगितले होते. उदाहरणच द्यायचे असेल तर विज्ञान शिक्षणाचे देता येईल. जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र हे तीन विज्ञानाचे घटक भिन्न भिन्न शिकविले जातात. त्यामधील परस्पर संबंध विशद केला जात नाही. त्याऐवजी हे तीनही विषय एकत्रितपणे शिकविले जावेत असे सुचविले होते. त्यानुसार शालेय स्तरावर पाठ्यपुस्तके देखील लिहिली गेली. ही पाठ्यपुस्तके लिहिण्याच्या कामात मी स्वत: सहभागी झालो होतो.

इसवी सन २००५ साली राष्ट्रीय शिक्षण धोरण पुन्हा एकदा सादर करण्यात आले. या धोरणात शिक्षणाच्या भारतीयीकरणावर भर देण्यात आला होता. त्यानुसार पुन्हा एकदा पाठ्यपुस्तके लिहिण्याचे काम हाती घेण्यात आले. दिल्लीत असलेल्या राष्ट्रीय शिक्षण आणि संशोधन परिषदेने प्रथम अभ्यासक्रम तयार केला आणि त्याबरहुकूम पाठ्यपुस्तके तयार केली. ही पुस्तके देशातील सर्व राज्यांना उपलब्ध करून देण्यात आली. काही राज्यांनी ती जशीच्या तशी स्वीकारली, तर काहींनी त्यात योग्य ते बदल करून सुधारून घेतली.

राष्ट्रीय शिक्षण आराखड्याने वेळोवेळी जे बदल सुचवले त्याचे पडसाद शिक्षण प्रणालीत उमटले, नाही असे नाही. परंतु शिक्षणात आमूलाग्र बदल असे झालेच नाहीत. शिक्षणाचा ढाचा जसाच्या तसाच राहिला. राज्य सरकारने विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याचा सपाटा सुरू केला. या शाळांवर शासनाचे फारसे नियंत्रण नसते. काही शिक्षण संस्था तर व्यावसायिक संस्था म्हणून चालविलेल्या जात आहेत. विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास अशा संस्थामध्ये गौण ठरला. यात भर घातली कोचिंग क्लासेसनी. येथे आकलनापेक्षा स्मरणशक्तीला जास्त महत्त्व दिले जाते. त्यामुळे, 'पुढे पाठ मागे सपाट' असे चित्र दिसते.

२०१९ च्या शिक्षण मसुद्यात भारतीय शिक्षणाचा सर्व बाजूंनी विचार केला आहे. अगदी बालवाडी पासून ते महाविद्यालयीन शिक्षण या सगळ्या बाबींवर येथे प्रकाश टाकलेला आढळतो. शिक्षकांची, निवड त्याचे सेवापूर्व शिक्षण आणि सेवांतर्गत प्रशिक्षण या बाबतीत अनेक सूचना केलेल्या आहेत. आजच्या घडीला पदवी-शिक्षण पूर्ण करून विद्यार्थी एक वर्षाचा बी. एड. चा कोर्स शिक्षण महाविद्यालयात करतात. आता हा कोर्स दोन वर्षांचा करण्याची योजना आहे. याखेरीज एकात्मिक बी. ए.. बी. एड. तसेच बी. एससी.

(पृष्ठ क्र. ३ वर)



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष विसावे/अंक ७/जुलै २०१९

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २४ वे/अंक १ ला)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | आखातात उडणार युद्धाचा भडका? | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | ३ |
| ३) | विनाशकारी काजवा महोत्सव | सायली पालांडे-दातार | ६ |
| ४) | जाणतेनि गुरू भजीजे। | भाग्यश्री दत्तात्रय कुलकर्णी | १० |
| ५) | प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था | श्री. मधुकर गजानन दातार | १२ |
| ६) | आषाढातील सण व उत्सव | डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी | १६ |
| ७) | युकेंडिया... | श्री. युवराज विवेक ताम्हणकर | १८ |
| ८) | मानसिक आजारी व्यक्तींसाठी पुनर्वसन केंद्र एक सामाजिक गरज | प्रा. डॉ. अनिल वर्तक | २१ |
| ९) | अल हमास ते सँटा इग्लेशिया कॅथेड्रल | श्री. संकेत कुलकर्णी | २८ |
| १०) | श्रद्धांजली-गिरीश कर्नाड : श्रेष्ठ लेखक, नट, दिग्दर्शक | श्री. सुधीर नांदगांवकर | ३० |
| ११) | जपानी भाषा व संस्कृती | गौरी अंबाजी परब | ३३ |
| १२) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

\- संपादक

# आखातात उडणार युद्धाचा भडका?

*आखाती देशांमध्ये सध्या युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. तेथे युद्धाचे ढग घोंगावताना दिसत असून परिस्थिती अत्यंत संवेदनशील झाली आहे. या स्थितीचा ज्येष्ठ परराष्ट्र धोरण विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी घेतलेला आढावा – संपादक*

आखाती देशांमध्ये सध्या युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. तेथे युद्धाचे ढग घोंगावताना दिसत असून परिस्थिती अत्यंत संवेदनशील झाली आहे. कोणत्याही क्षणी युद्धाची ठिणगी पडू शकते अशी भीती जागतिक समुदायाला वाटत आहे. अमेरिकेने हे सर्व गृहित धरून युद्धसामग्री वाहक विमाने आधीच लाल समुद्रामध्ये पाठवून दिली आहेत. याखेरीज इराकमधील ५००० अमेरिकन सैनिकांना सज्ज राहाण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दुसरीकडे अमेरिकेच्या सांगण्यावरून सौदी अरेबिया आणि आखाती देशांनी कुरापती काढायला सुरुवात केली आहे. या देशांनी इराणमुळे त्यांच्या तेलवाहू नौका धोक्यात आल्याची तक्रार केली आहे. त्यांच्या तेलाच्या पाईपलाईन्सवर हल्ला होण्याची चिन्हे आहेत, असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. इराण या सर्वांचे प्रत्युत्तर कसा देतो त्याकडे सर्वांचे लक्ष आहे. इराणने प्रत्युत्तर दिल्यास या देशांना आयती संधी मिळणार असून, त्यातून युद्धाचा वणवा पेटू शकतो. हे युद्ध केवळ दोन देशांमधील न राहता संपूर्ण आखाती प्रदेश या युद्धाच्या आगीत होरपळून निघणार आहे.

अलीकडील काळात आखाती देशांमध्ये पंथाच्या नावाने ध्रुवीकरण झालेले आहे. हे ध्रुवीकरण अर्थातच शिया आणि सुन्नी अशा दोन पंथांमध्ये झाले आहे. पूर्वी इस्राईल विरोधात सर्व मुस्लिम राष्ट्रे असे धुव्रीकरण होते. परंतु आजघडीला सर्व सुन्नी राष्ट्रे इराणविरूद्ध एकत्र येतील असे चित्र निर्माण झाले आहे. त्यांची तयारीही झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॉन बोल्टॉन यांचे धोरण अत्यंत आक्रमक आहे आणि ते सातत्याने युद्धाची भाषा करताहेत. त्याउपर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, ‘सध्यातरी आम्हाला युद्ध नको आहे’ असे सांगितले असले तरीही आखातातील परिस्थिती अत्यंत स्फोटक झाली आहे.

या सर्व स्फोटक परिस्थिती बाबत रशिया आणि चीन या दोन्ही देशांनी आपली भूमिका जाहीर केलेली नाही. अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापारयुद्ध दिवसेंदिवस तीव्र होत चालले आहे. या व्यापारयुद्धांतर्गत चीनवर २०० अब्ज डॉलरचे अतिरिक्त आयातशुल्क लावण्याची घोषणा अमेरिकेने नुकतीच केली आहे. त्यामुळे इराणच्या मुद्द्याबाबत चीन अमेरिकाविरोधी भूमिका घेईल अशी परिस्थिती नाही. दुसरीकडे रशिया आधीच आर्थिक निर्बंधामध्ये अडकला असून त्यांची आर्थिक परिस्थिती डळमळीत झाली आहे. त्यामुळे रशियाही याबाबत बोटचेपी किंवा तटस्थ भूमिका घेण्याची शक्यता आहे.

**अमेरिकाकेंद्रीत एकध्रुवी रचना**

एकविसाव्या शतकात बहुध्रुवीय विश्वरचनेची चर्चा होत असली आणि तशी रचना निर्माण झाल्याचे बोलले जात असले तरी खऱ्या अर्थाने अमेरिकाकेंद्रीत एकध्रुवी

रचना अजूनही कायम आहे. अमेरिका आपल्या मर्जीनुसार कोणत्याही देशाविरोधात कारवाई करते आहे. २०१५ मध्ये बराक ओबामा यांनी केलेल्या करारातून डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच एकतर्फी माघार घेतली. त्यानंतर इतर देशांवर इराणकडून तेलआयातीवर निर्बंध टाकले गेले. यामध्ये भारताबरोबरच जपान, दक्षिण कोरियाचाही समावेश आहे. अमेरिकेची मित्र राष्ट्रे असूनही त्यांना सातत्याने धमकी दिली गेली आहे. डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आल्यानंतर त्यांनी लगेचच इराणबरोबरच्या करारातून माघार घेण्याचे सूतोवाच केले होते. ट्रम्प यांना इराणमध्ये सत्ताबदल हवा आहे. इराणमधील विद्यमान सत्तारूढ शासन हे अमेरिकेच्या आखाती प्रदेशासाठीच्या धोरणाला अनुकूल नाही, असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. असाच प्रकार २० वर्षांपूर्वी इराकमध्ये दिसून आला होता. त्यावेळी असणारे सद्दाम हुसेन यांचे शासन अमेरिकेला नकोसे होते. तिथे अमेरिकेने लष्करी हस्तक्षेप केला आणि सद्दाम हुसेन शासन उलथवून टाकले. तसाच प्रकार आता इराणच्या बाबतीत घडतो आहे. यासाठी बहुतांश सर्व देशांना अमेरिका वेठीस धरत आहे. अमेरिकेचे हस्तक असलेल्या तिथल्या काही सुन्नी राष्ट्रांनाच हे युद्ध हवे आहे, अशा स्वरूपाची स्फोटक परिस्थिती निर्माण केली जात आहे.

### अमेरिकेला काय साध्य करायचंय?

अमेरिकेचा दृष्टीकोन पूर्णतः व्यापारी आणि आर्थिक आहे. आखातातील वातावरण स्फोटक बनते तेव्हा त्याचा परिणाम तेलाच्या किंमतीवर होतो. तेलाच्या किमती मोठ्या प्रमाणावर वाढतात. साहजिकच यातून अमेरिकेला संधी निर्माण होते. अमेरिका तेलनिर्मिती आणि तेलनिर्यातीच्या बाजारात उतरण्यात प्रयत्नशील आहे. आखातातील तेलाच्या किंमती वाढल्या की अमेरिकेची तेलाची मागणी वाढते; कारण इराणच्या तुलनेत हे तेल स्वस्त मिळते. ही विक्री वाढावी यासाठी अनेकदा अमेरिकेत अशी परिस्थिती कृत्रिम पद्धतीने निर्माण केली जाते. आताच्या स्थितीत कदाचित प्रत्यक्ष युद्ध होणारही नाही. तोपर्यंत तेलाच्या किंमती चढ्या राहतील आणि त्यातून अमेरिकेचा नफा होईल. ही स्थिती जाणीवपूर्वक निर्माण केली जात आहे. विशेष म्हणजे युरोपियन देशही याविरोधात बोलायला तयार नाहीत. युरोपमधील मोठी राष्ट्रे ही अंतर्गत विवादात गुंतलेली आहेत. ब्रिटनसारखा बडा देश सध्या ब्रेक्झिटच्या प्रश्नाशी झगडतो आहे. शिवाय आर्थिक मंदीची लाटही आहे. त्यामुळे अमेरिकेच्या विरोधात जाण्यासाठी कोणताच देश तयार नाही. याचा फायदा घेत अमेरिका पश्चिम आशियावर युद्ध लादण्याचा प्रयत्न करत आहे. इराणदेखील दंड थोपटून उभा राहिला आहे.

### तेलव्यापार संकटात?

ही परिस्थिती स्फोटक राहिली आणि युद्धाला तोंड फुटले तर त्याचा पहिला परिणाम तेलाच्या व्यापारावर होईल. स्ट्रेट ऑफ होर्मुज हा एक निमुळता समुद्री मार्ग आहे. याला होर्मुजची सामुद्रधुनी म्हटले जाते. या मार्गाची लांबी ३९ किलोमीटर म्हणजे २१ समुद्री मैल एवढी आहे. आखातामधून होणाऱ्या तेलनिर्यातीपैकी ८० टक्के निर्यात या मार्गे होते. इराण, ओमान आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यामध्ये या समुद्रीमार्गावर हक्क सांगण्यासाठी संघर्ष सुरू आहेच. संयुक्त राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय करारानुसार प्रत्येक राष्ट्राची समुद्री सीमा ही १२ नॉटीकल माईल म्हणजे १२ समुद्री मैल आहे. त्यानुसार ओमान आणि संयुक्त अरब अमिराती या दोन्हीही राष्ट्रांनी यावर हक्क सांगितला असून त्यावरून त्यांच्यात मोठा संघर्ष सुरू आहे. आता इराणनेही या सामुद्रधुनीला लक्ष्य केले आहे. आमच्यावर बहिष्कार टाकला गेला आणि तेलाची निर्यात करू दिली नाही तर इतर देशांनाही तेलाची निर्यात करू दिली जाणार नाही. होर्मिजचा समुद्र मार्गच बंद पाडू अशी भूमिका

इराणने घेतली आहे. याचा एकूणच परिणाम आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर पडणार असून त्याची सर्वात मोठी झळ भारत, चीन, जपान, दक्षिण कोरिया या राष्ट्रांना बसणार आहे. त्यामुळेच ही परिस्थिती अत्यंत चिंतेची आहे.

**भारताला फटका आणि उपाय**

या सर्व परिस्थितीत भारतापुढे काय पर्याय आहेत हे पाहणे आवश्यक आहे. भारताने ही परिस्थिती लक्षात घेऊन तत्काळ सावधगिरीचे उपाय सुरू केले पाहिजेत. आखाती प्रदेशात आणीबाणीची परिस्थिती निर्माण होते तेव्हा तेलाच्या समस्येचा सामना करावाच लागतो. याखेरीज पहावी लागते ती तिथे राहाणाऱ्या भारतीयांची सुरक्षा. आजघडीला जवळपास ७० लाख भारतीय तिथे काम करताहेत. या सर्व भारतीयांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येतो. आपत्कालीन परिस्थितीमुळे तिथल्या लोकांना मायदेशी परत आणावे लागते. केंद्रामध्ये आलेल्या शासनाला सर्वप्रथम कदाचित याच परिस्थितीचा सामना करावा लागणार आहे. त्याचबरोबर आपल्यासाठी इराणशी असलेला तेलव्यवहार खूप महत्त्वाचा आहे. कारण इराणकडून आयात केल्या जाणाऱ्या तेलाच्या देयकाबाबत आपल्याला ६० दिवसांची मुदत मिळते. तसेच मोफत विमा संरक्षणही दिले जाते. भारतातील तेलाचे चार शुद्धीकरण प्रकल्प हे इराणच्या तेलावरच अवलंबून आहेत. सध्या इराणकडील आयात आपण खूप कमी केली आहे. पण भारत– इराण संबंध अत्यंत महत्त्वाचे आहेत. भविष्यातही इराण– भारत मैत्री संबंध कायम राहातील, हे भारताने अमेरिकेला सांगितले पाहिजे. इराणवरील निर्बंधांचा कोणताही परिणाम चाबहार बंदराच्या विकासावर होणार नाही याची काळजी भारताने घेतली पाहिजे. यापूर्वी १९५० च्या दशकात भारताने आखाती प्रदेशात सुएज कालवा प्रकरणात महत्त्वाची भूमिका बजावली होती. तशा प्रकारची भूमिका भारत बजावू शकतो.

भारत हा एकमेव देश आहे ज्याचे शिया आणि सुन्नी अशा दोन्ही पंथांच्या देशांबरोबर चांगले संबंध आहेत. त्याचप्रमाणे सुन्नी आणि इस्राईल बरोबर चांगले संबंध आहेत. त्यामुळे भारत राजकीय मध्यस्थाची भूमिका उत्तम पार पाडू शकतो. या संदर्भामध्ये खुली चर्चा किंवा गुप्त चर्चाही भारत करू शकतो. आपल्याला काही युरोपिय देशांमध्ये गुप्त बैठका ह्या तिथल्या इराण, सौदी अरेबिया, इस्राईल यांच्या प्रतिनिधींबरोबर घेता येतील.

राजनैतिक पातळीवर हे करत असताना तेलाच्या पर्यायी पुरवठ्याची व्यवस्था करावी लागणार आहे. अमेरिकेने इराण, रशिया यांच्याबरोबर तेलाचा मजबूत साठा असलेल्या व्हेनेझुएला या देशावरही बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे आपल्याला थेट इराणकडून तेल घेता आले नाही तरी आपण इराणकडील तेल तिसऱ्या देशाकडून घेऊ शकतो. म्हणजे इराण ज्या देशांना तेल विकतो त्यांच्याकडून तेल विकत घेता येते का असाही विचार केला पाहिजे. २०१२ मध्ये हा विचार भारताने केला होता. त्यामुळे देशातील निवडणुकांनंतर आता जे सरकार आले आहे त्याला या प्रश्नाला सामोरे जावे लागणार आहे. या युद्धजन्य परिस्थितीचा सामना कसा करायचा आणि त्यानंतर येणारे तेलसंकट, तेथील भारतीयांच्या सुरक्षेचे संकट या सर्वांबाबतीत वेळीच सावध पवित्रा भारताला घ्यावा लागणार आहे. तसेच भविष्यात काही महत्त्वाची पावले भारताला जरूर उचलावी लागणार आहेत.

**– डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी – ९७०२०३५८००

●●●

# विनाशकारी काजवा महोत्सव

*उन्हाळा संपून पावसाळ्याच्या सुरवातीला हवा कुंद, दमट होऊन झाडी असलेल्या प्रदेशात एक वेगळं वातावरण तयार होतं. अंधार असलेले, पाऊस नसलेले, वारा नसलेले, ढग नसलेले तरी दमट,ओलसर संध्याकाळचे वातावरण हे काजव्यांच्या प्रजननासाठी पोषक असते, या काळात भरवला जाणारा काजवा महोत्सव कसा विनाशकारी आहे हे सांगणारा लेख - संपादक*

दरवर्षी 'काजवा महोत्सव' या गोंडस नावाखाली तो बघायला सह्याद्रीच्या संवेदनशील भागांत मोठ्या प्रमाणात गर्दी होते.वास्तविक हा काळ काजव्यांच्या प्रजननाचा काळ असतो. त्यामुळे 'महोत्सवा'च्या नावाखाली होणाऱ्या गर्दीमुळे या प्रक्रियेत अडथळा येतो. या अनावश्यक गर्दीमुळे काजवे नामशेष होण्याचा धोका आहे...

काल परवा कोसळलेल्या धुव्वांधार पावसाच्या सलामीने लोकांचा उन्हाळ्याचा क्षीण पार धुऊन निघाला आहे! तीन-चार महिने घरात कोंबून बसलेल्या, आपल्या सर्वांना आता पावसाळी सहलीमध्ये बागडायचे वेध लागले आहेत. भटक्या लोकांना पावसाळी सहली काही नवीन नाहीत. पावसाळ्याच्या सुरवातीचे कुंद वातावरण तर सगळ्यांचाच विकपॉइंट! विविध टूर कंपन्या, ट्रेकिंग कंपन्या माणसाच्या या नैसर्गिक ओढीचे व्यावसायिक संधीत रूपांतर करत असतात. अनेक ठिकाणी गावकरी, स्थानिक सहकारी संस्था, रोजगाराची संधी म्हणून असे उपक्रम राबवताना दिसतात. पर्यटन व्यवसाय म्हटलं तर ग्राहकांना नवनवीन अनुभव देणं आलं, अनुभवातले नावीन्य आणि वेगळेपण हा ग्राहकांना खूश करण्याचा मार्ग!

अशाच एका वैभवी निसर्ग सोहळ्याचा गेल्या ४-५ वर्षांत आपण बाजार होताना बघत आहोत. शतकानुशतके निसर्गात अविरत सुरू असलेल्या, काजव्यांच्या मिलन सोहळ्याच्या सौंदर्याने माणसाला भुरळ घातली. या अप्रतिम निसर्गक्रियेची वर्णनं वर्तमानपत्र व सोशल मीडियावर फिरू लागली, त्याचे झळाळणारे रूप छायाचित्रांमधून झळकू लागले. अशा आकर्षक जाहिरातींनी घरात बसलेल्या एरवी न भटकणाऱ्यांनासुद्धा न्यूनगंड वाटून 'काजवा महोत्सव' इन्जॉय करावासा वाटू लागला आहे.

आज सोशल मीडियावर अशा 'इव्हेंट्स'आणि 'फोटोशॉप' छायाचित्रांची चढाओढ लागली आहे. आज अनेक संस्था, गाड्या भरभरून, पश्चिम घाटातील संवेदनशील भागात जाऊन, तिथे जेवण-खाणे -पिणे राहणे अशी व्यवस्था करून, महोत्सव साजरे करत आहेत. त्यात सर्व प्रकारचे हवशे, नवशे, गवशे सामील झाले असून ते एक प्रकारचे 'फॅड' बनले आहे. एरवी नैसर्गिक भान असणाऱ्या संस्थासुद्धा यात मागे नाहीत. अभ्यासाचे, माहितीचे कारण पुढे करून अनेक ठिकाणी व्यावसायिक पर्यटन राबवलेले दिसते; पण किती झाले तरी, पायी भटकंती करताना अचानक एका जंगल कोपऱ्यात काजव्यांचे मिलन पाहायला मिळणे वेगळे आणि ठरवून, मोठ्या संख्येने, वाहनाने जाऊन तिथे पिकनिक करणे वेगळे!

माणसाला 'साजरा' करावासा वाटणाऱ्या या महोत्सवामुळे काजव्यांच्या अनेक प्रजाती नामशेष होऊ शकतात.

**काजव्यांची दुनिया!**

काजवा हा कणा नसलेल्या (अपृष्ठवंशीय) बीटल समूहातील लँम्पिरिडी या कीटक कुटुंबातील प्राणी आहे. त्यांच्या २१०० हुन अधिक प्रजाती, उष्णकटिबंध (tropical) आणि समशीतोष्ण (temperate) पट्ट्यात नांदतांना दिसतात. पाणथळ, दलदल, दमट भरपूर झाडी असलेले भाग यांच्या वाहिवाटेच्या जागा! त्यात काजव्यांच्या बऱ्याच जाती रात्री कार्यरत असतात तर काही अपवादात्मक, दिवसा!

आज स्वच्छतेच्या जमान्यात सगळ्यांना 'किटाणू' अच्छे नाहीत, असे वाटते! पण बीटलवर्गीय प्राणी हे जैविक कचऱ्याच्या विघटनाचे मोठे कार्य पार पाडतात, परागीभवनाच्या क्रियेत ते महत्त्वाची भूमिका बजावतात. अनेक कृमी कीटकांचा यथेच्छ समाचार घेऊन, झाडांना त्रासदायक कीटकांचा प्रादुर्भाव होऊ देत नाहीत. निसर्गातील सर्व गोष्टींमध्ये 'उपयुक्तता' शोधणाऱ्यांना काजव्यांबद्दल प्रेम वाटायला एवढे कारण पुरेसे आहे.

पश्चिम घाटातील, काजव्यांच्या बहुतांशी जातींमध्ये मादी ही पंख विरहित असते व अळी स्वरूपात असते. काजव्यांमध्ये निर्माण होणारा प्रकाश, सहित स्वरूपाचा, रासायनिक क्रियेतून होणारा जैविक-प्रकाश (bioluminescence) आहे. मॅग्नेशिअम व प्राणवायूच्या उपस्थितीत, काजव्यांच्या पोटात लुसिफेरसचे (luciferase) व लुसिफेरीन (luciferin) रसायनांची प्रक्रिया होऊन प्रकाश निर्मिती होते. सुरवातीला असा समज होता की, काजव्यांची प्रकाशनिर्मिती भक्षकांना घाबरवण्यासाठी, पळवून लावण्यासाठी होत असावी. पण, प्रकाश मुख्यतः मादीला आकर्षित करण्यासाठी निर्माण केला जातो, हे आता विविध संशोधनातून मान्य झाले आहे.

**काजवा महोत्सव का नाजूक मिलनकाल!**

कुठल्याही दोन ऋतूंच्या वेशीवरचा संक्रमणाचा काळ हा विलक्षण असतो. उन्हाळा संपून पावसाळ्याच्या सुरवातीला हवा कुंद, दमट होऊन झाडी असलेल्या प्रदेशात एक वेगळं वातावरण तयार होतं. अंधार असलेले, पाऊस नसलेले, वारा नसलेले, ढग नसलेले तरी दमट, ओलसर संध्याकाळचे वातावरण हे काजव्यांच्या प्रजननासाठी पोषक असते. हा कालावधी इनमीन दहा ते पंधरा दिवसांचा असतो. असे आर्द्र वातावरण सह्याद्रीतील जंगलांच्या विशिष्ट भागात तयार होते. अशा वैशिष्ट्यपूर्ण रंगमंचावर काजवे आपले प्रणयाराधन सुरू करतात. सुरवातीला एखाद दुसरा लुकलुकणारा काजवा दिसतो व थोड्याच वेळात तिथे ग्रँड ऑर्केस्ट्रा सारखी देखणी मैफील जमते. विविध प्रजातींमध्ये जैविक प्रकाशाचे प्रमाण, रंग, आणि फ्रिक्वेन्सी वेगवेगळी असते. त्यानुसार विविध काजव्याचे पट्टे फुलत जातात. मधेच, सगळा मंच उजळून निघतो आणि स्वर्गीय सौंदर्याचा प्रत्यय येतो. विशिष्ट जातीचे नर काजवे एकमेकांशी रासायनिक फेरोमोन वापरून संपर्क साधतात. त्यांच्या रासायनिक संवादातून ते एक एक प्रकाश बिंदू निर्माण करत, मोठा देखावा निर्माण करतात.या देखाव्याच्या मूळ प्रेक्षक, जमिनीवर बसलेल्या मादी काजवा असतात, ज्यांना उडता येत नाही. या देखाव्याला दाद म्हणून त्याही मधून मधून क्षीण प्रकाश संकेत देत असतात. नर काजव्याकडून येणाऱ्या प्रकाशातून त्यांना काजव्याच्या प्रजनन क्षमतेची माहिती मिळत असते. मोठा प्रकाश पडणारा, जास्त वेगाने लुकलूक करणारा काजवा, 'काजविणीं'ना जास्त प्रभावित करतो. हे सर्व करण्यासाठी नर काजव्यांना प्रचंड मोठ्या प्रमाणात ऊर्जा खर्च करावी लागते; तसेच भक्षकांना बळी पडण्याचा जास्त धोका संभवतो.

एकदा संकेतांची देवाण-घेवाण झाली, की नर काजवे खाली उतरून मादींशी मिलन करतात. काही मादी काजवे खोटे संकेत देऊन नर काजव्यांना भुलवून त्यांचा चट्टामट्टा करून मोकळ्या होतात. एकूण, आपला

वंश पुढे नेण्यासाठी काजव्यांना निसर्गतःच जिवाची बाजी लावावी लागते. पुढे, काही दिवसात पाणथळ जागी अंडी घातली जातात व काजव्यांचा पुढील जीवनक्रम सुरू होतो.

**आपण काय करतो?**

सोहळा विलक्षण आहे, स्वर्गीय आहे यात दुमत नाही! पण माणसाने हे लक्षात घ्यायला हवे की, ही सर्व धडपड निसर्गातील वंश सातत्यासाठी आहे. माणसाच्या उपभोगाची नाही! हा प्रसंग दुर्मीळ, वर्षातून एकदाच, मोजक्या ठिकाणी होणारा आहे; पण दुर्दैवाने त्याबद्दल पुरेशी संवेदनशीलता बाळगली जात नाही. वरील वर्णनातून तुम्हाला हे तर लक्षात आलेले असेल, की काजव्यांसाठी अशा ठिकाणी अंधार असणे किती आवश्यक आहे! आपण जेव्हा मोठ्या संख्येने टॉर्च विजेऱ्या घेऊन जातो, छायाचित्रकार फोकस व्हावं म्हणून विविध रंगांचे, फ्रिक्वेन्सीचे दिवे लावताना दिसतात; तसेच, आपण नेलेल्या वाहनांचा प्रकाश, कॅम्पवरचा प्रकाश तेव्हा मूळ नैसर्गिक क्रियेवर विपरीत परिणाम करत असतात. प्राण पणाला लावून मादीला आकर्षित करणाऱ्या काजव्यांचा तग या कृत्रिम प्रकाशासमोर लागणार कसा? मादी काजव्यांची या प्रकाशाच्या भाऊगर्दीत दिशाभूल होते, गोंधळ उडतो. झाडांवर सोहळे बघण्यात गर्क असलेल्या मंडळींना पायदळी मादी काजवे तुडवले जात आहेत,याचे भान नसते. आपल्या वाहनांनी आपण पश्चिम घाटातील संवेदनशील जंगलांमध्ये काजव्याच्या लोभाने आत आत शिरत जातो व अधिवासाचा विध्वंस करत जातो.

आज सह्याद्रीच्या उत्तरेतील पुरुषवाडी-अकोले, रतनगड, हरिश्चंद्रगड, पाबे घाट, राजमाची, ताम्हिणी, अंधारबन, भीमाशंकर, वरंधा, महाबळेश्वर पासून ते दक्षिणेकडील राधानगरी, पारगड-कोल्हापूरपर्यंत सर्व ठिकाणी झुंडीच्या झुंडी काजवे पाहायला जात आहेत. वर उल्लेखलेल्या सर्व जागा या अभयारण्याचा किंवा संरक्षित जंगलांचा भाग आहे. तिथे राजरोसपणे जाणे योग्य नाही. किंबहुना, परवानगीशिवाय जाणे बेकायदेशीर ठरते. या जंगलांमध्ये काजव्यां व्यतिरिक्त दुर्मीळ प्राणी आणि वनस्पती प्रजातींचा वास आहे. संध्याकाळी व रात्री जंगलात जाण्याने त्यांच्या पाण्याच्या, शिकारीच्या, अन्न मिळवण्याच्या कार्यात व्यत्यय येतो व त्यांना इतर ठिकाणी आसरा घ्यावा लागतो. तिथे जाऊन, आपण त्यांच्या उरलेल्या जागेत, त्यांच्या वेळेवर अतिक्रमण करत आहोत. गोंगाट, हवेतील प्रदूषण ,कचऱ्यामुळे मूळ नैसर्गिक अधिवासाची कधीही न भरून निघणारी हानी करत आहोत. जसे जसे 'काजवा महोत्सव' लोकप्रिय होत चालले आहेत तसे तसे जास्त संख्येने लोक अशा ठिकाणी भेटी देत आहेत. हे, असेच अनिर्बंध चालत राहिले तर काजव्यांचा प्रजाती मुख्यतः प्रदेशाधिष्ठित (endemic) प्रजाती नष्ट व्हायला वेळ लागणार नाही.

उद्या एखाद्या ठिकाणचे काजवे संपले तर ग्राहकांना खूष करण्यासाठी व्यावसायिक संस्था काजवे शोधत जास्त आडवाटेच्या अधिवासांकडे वळतील! हे सह्याद्रीच्या जैवविविधतेसाठी प्रचंड धोक्याचे आहे. सन २०१० पासून जगभरात काजवे कमी होताना आढळत आहेत व त्याबद्दल संशोधकांची ओरड चालली आहे. ट्रॅफिक, प्रकाशाचे प्रदूषण, जंगल व पाणथळ जागा कमी होणे व औषधासाठी गोळा करणे ही त्यांच्या नष्ट होण्याची मुख्य करणे आहेत. आजही, आपल्याला पश्चिमघाटातील काजव्यांबद्दल पुरेशी माहिती नाही. सर्व प्रजाती माहीत नाहीत, त्यांच्या प्रकाश संभाषणाचा अभ्यास नाही. आपल्या पर्यटनामुळे त्यांच्यावर व परिसंस्थेवर काय दूरगामी परिणाम होत आहेत याचा संख्यात्मक अंदाज नाही. त्याचा पुरेसा अभ्यास करायलाही आज अवकाश नाही, हे दुदैव आहे. समज पूर्णपणे विकसित नाही तर संवर्धन दूरची गोष्ट आहे! काजव्यांचा सोहळा हा निसर्गातील अत्यंत दुर्मीळ

दृश्यांपैकी एक आहे. सह्याद्रीच्या वैभवशाली जंगलांमध्ये तो घडतो यात आपण आनंद आणि अभिमान मानायला हवा. एकदा नाहीसे झाल्यास कितीही किंमत देऊन आपल्याला हे दृश्य निर्माण करता येणार नाही, आणि महत्त्वाच्या प्रजाती नष्ट झाल्याने निसर्ग साखळीतले दुष्परिणाम थांबवता येणे अशक्य होईल.

लहानपणी आपल्यापैकी अनेकांनी काडेपेटीत, काचेच्या बाटलीत काजवा पकडून, हरखून जाऊन, त्या प्रकाशाची मजा अनुभवली असणार! त्यात एक निरागसता होती, निसर्गाबद्दलचे कुतूहल होते. माणसाला नेहमीच सौंदर्याची लालसा राहिलेली आहे. त्यात काजव्यांचे सामूहिक मिलन तर अद्भुत प्रकरण आहे; पण सर्व आजूबाजूचा निसर्ग हा आपल्याच मनोरंजनासाठी निर्माण केला आहे हे मानणे चुकीचे आहे. संवर्धन करणाऱ्या अनेक संस्थांनी असे मांडले आहे की, माणसाला त्याच्यासारखे असणारे प्राणी, मोठे प्राणी हे संवर्धनासाठी जास्त मौल्यवान, योग्य वाटत आले आहेत. यांच्या तुलनेत, काजवे हे कणा नसलेले कीटक म्हणजे किस झाड की पत्ती! पण म्हणून, त्यांच्या अधिवासात जाऊन, मिलनाचे खासगी क्षण असे चवीचवीने बघत, त्यात व्यत्यय आणणे कितपत बरोबर आहे? जगभर अपृष्ठवंशीय प्राण्यांबद्दल माणसाची आस्था आणि प्रेम कमी पडते आहे व संवर्धनाला पुरेसा हातभार लागत नाही. निसर्गाकडे पाहताना एक सहवेदनेच्या पातळीवर आपण या सर्व जीवसृष्टीकडे, स्वार्थी मानावाधिष्ठित दृष्टिकोनातून न बघता 'वसुधैव कुटुंबकम' या भावनेने नक्कीच बघू शकतो. दैवी वाटणाऱ्या काजव्यांचा प्रकाश चिरकाल टिकावा आणि त्यांची पुरेशी संख्या निसर्गात कायम राहील याकरता प्रयत्न करायला हवेत.

मलेशिया, न्यूझीलंड अशा अनेक देशांत काजव्यांचे 'पर्यावरण पूरक' पर्यटन होत आहे. पर्यावरणपूरक म्हणजे फक्त पर्यावरणाची ओळख आणि उपभोग नव्हे तर त्याने पर्यावरण संवर्धनाला कसा हातभार लागेल हे बघणे! तेथील स्थानिक समूह काजव्यांच्या सोहळ्याचे निवडक लोकांसाठी पर्यटनाचे आयोजन करतात. त्यातून होणारा फायदा ते छोट्या कीटक आणि इतर प्रजातींच्या संवर्धनासाठी वापरत आहेत. हे करताना कडक नियम पाळून मर्यादित स्वरूपात हे उपक्रम सुरू आहेत. लोकांची हे बघण्याची कळीची इच्छा आणि संवर्धनसाठीचे निकष सांभाळणे, ही तारेवरची कसरत आहे. पण, भविष्यातील अशा तरतुदींची आपल्याकडे व्यवस्था करणे अपरिहार्य आहे, प्रसंगी सह्याद्रीतील पर्यटनावर कठोर निर्बंध घालणे आवश्यक वाटते.

काजवा महोत्सवातून होणारे निसर्गाचे नुकसान हा प्रश्न सोपा वाटला तरी उत्तरं सोपी नाहीत. आज या अधिवासातील माणसाचा वावर नियंत्रित करायला पुरेशी यंत्रणा नाही, वनविभाग विविध मर्यादांमुळे मोठ्या प्रदेशात अशी अंमलबजावणी करू शकत नाही. काजव्यांची सुंदर प्रकाश आरास पाहू नका, असे सरसकट म्हटलं तर 'तुम्ही कोण आम्हाला सांगणार', असा प्रश्न हमखास उपस्थित होईल. पण, काजवा प्रजाती व अधिवासाच्या संवर्धनासाठी आपल्या इच्छेला मुरड घालणे, हाच यावर जालीम उपाय आहे.

'कट्यार काळजात घुसली' चित्रपटात, तळ्याकाठच्या गाण्यात काजव्यांची प्रकाशबेटे फुलवताना अशीच निसर्ग जगताशी संवाद साधणारी भावना व्यक्त केली गेली आहे. निसर्ग साधक व्हायचे असेल तर इतर प्राणिमात्रांबद्दलची सहवेदना अनुभवायला हवी! पृथ्वीवरील ही स्वर्गीय दृष्ये आणि त्याचे निर्माते जपणे आपल्याच हातात आहे!

मन मंदिरा... तेजाने उजळून घेई साधका,
संवेदना संवादे, सहवेदना जपताना!

**– सायली पालांडे–दातार**
भ्रमणध्वनी :९८८१००९८२६

•••

नेहमी लक्षात ठेवा, उघडण्यासाठी दुसरे दार तयार ठेवल्याशिवाय निसर्ग पहिले दार कधीच बंद करत नाही!

# जाणतेनि गुरू भजीजे।

*गुरूचे महत्त्व सांगणारा लेख - संपादक*

म्हणोनि जाणतेने गुरू भजीजे। तेणे कृतकार्य होईजे।
जैसे मुळसिंचने सहजे। शाखापल्लव संतोषनी।।

ज्ञानेश्वरीचा पहिला अध्याय, माउलींनी मंगला चरणात गणेशाचं सुंदर वर्णन केलं. शारदास्तवन झाले. त्यानंतर सुरू झाले श्रीगुरुस्तवन. ही ओवी गुरूंचे माहात्म्य सांगणारी. या ओवीतून माउलींनी गुरुभक्ती करावी हे तर सांगितलेच, पण आदर्श समाजाचा पायाच या ओवीतून माउलींनी जगाला सांगितला (घालून दिला).

तसं तर ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवी हा एक स्वतंत्र सिद्धांत आहे. त्रिकालबाधित सत्य आहे. त्यातीलच ही एक ओवी पुढं येणारं अगाध ज्ञान अंगिकारण्यासाठी लागणारी साधकाची मनोभूमिका तयार करण्यासाठी माउलींनी ही ओवी लिहिली आहे.

म्हणोनि जाणतेने गुरू भजीजे।

आता हा जाणता कोण? तर जो नेणता नाही किंवा लहान नाही तो जाणता. नेणता हा शब्द आपण लहान मुलांसाठी वापरतो, म्हणजेच जाणता म्हणजे प्रौढ, समजदार. लोकसत्तामध्ये चैतन्य प्रेम या नावाने एक सदर चालते. त्यात मागे मनाच्या श्लोकावर विवेचन होते. मनाच्या श्लोकात 'जनी' हा शब्द खुपदा येतो. उदा. जनी आपुले हित तुवा करावे. जनी दक्ष तो लक्ष लावुनी पाहे, ई तर या जनी शब्दाचा अर्थ त्यांनी सज्जन किंवा साधक भक्त असा केला. त्यामुळे त्या त्या श्लोकाचा अर्थ खूप सुंदर व सोपा झाला.

त्याप्रमाणे आता आपण 'जाणता' या शब्दाचा अर्थ सुरुवातीला पालक (आई-बाप) असा घेऊ. खरंच आता आपण मुलांसमोर 'गुरुब्रह्मा, गुरुर्विष्णु, गुरुर्देवो, महेश्वरः' असा आदेश ठेवतो का? मागच्या काळात एक म्हण होती. 'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम' यातील अतिशयोक्तीचा भाग सोडला तरी आदरभाव महत्त्वाचाच. तसं तर भारतीय परंपरेत गुरुकुल पद्धती होती. मुले गुरूगृही विद्याभ्यास करीत. तिथे मुलांना विद्याभ्यासा बरोबरच स्वावलंबी बनवले जाई. गुरुकुलातून परतलेला विद्यार्थी एक स्वावलंबी व सुजाण नागरिक म्हणून तयार झालेला असे.

आता याच्या उलट आहे. मुलांना खूप महागड्या शाळेत घातलं जातं. त्यातून आम्ही खूप पैसे खर्च करतो ही भावना बळावते. मग शिक्षकांनी शिक्षा केली की त्यांच्यावरच केस करण्याची भाषा बोलली जाते. केवढी ही अधोगती (अपवादात्मक प्रकारात गुरुजींचंही चुकलं असेल कदाचित) परिणामी मुले बेबंद होतात. त्यांना कोणाबद्दलही आदर रहात नाही.

माउली म्हणतात, 'जाणतेने गुरु भजिजे। तेणे कृतकार्य कोईजे।

जैसे मुळी संचने सहजे। शाखापालव संतोषती।।

म्हणजे गुरूबद्दल पूज्यभाव हा जीवनाचा पाया आहे. माउली म्हणतात पाणी मुळांना घातलं की ते पाने, फांद्या यांना आपोआपच पोचतं. म्हणजे नम्रता आदरभाव हा आपल्या जीवनाचा पाया असला पाहिजे

आणि जर पाया चांगला असेल तरच इमारत चांगली असू शकते. आपल्या पुढील पिढीचं भविष्य जर उत्तुंग बनवायचं असेल तर त्यासाठी मुलांना गुरुंबद्दल आदर ठेवण्यास शिकवलं पाहिजे हेच यातून माउलींना सुचवायचं आहे.

हे झालं पालकांचं.

आता जे कायद्याने सज्ञान झाले आहेत अशा जाणत्यांबद्दल बोलू

जाणतेने गुरू भजिजे। तेणे कृतकार्य होईजे।

कृतकार्य म्हणजे कृतकृत्य, समाधानी आयुष्य आणि असं समाधानी आयुष्य मिळवण्यासाठी आपल्याला गुरुंची सेवा करावी लागेल.

गुरू म्हणजे फक्त एक ठरावीक व्यक्ती का?

नाही, गुरू एक तत्त्व आहे. श्रीगुरू दत्तात्रेयांनी आपल्या आयुष्यता चोवीस गुरू केले होते. जे आपल्याला जगण्यासाठी आवश्यक ज्ञान देते ते गुरू तत्त्व जे आपल्या इह-पर कल्याणाची काळजी वहाते ते गुरू तत्त्व, गुरू म्हणजे पावित्र्य, गुरू म्हणजे मांगल्य, वात्सल्य, गुरू म्हणजे कृपा, गुरू म्हणजे आशीर्वादाचे भांडार. गुरू म्हणजे दिव्यत्व. आणि हे जिथे जिथे अनुभवयाला मिळते तिथे तिथे नतमस्तक व्हावे असे माउली म्हणतात.

दिव्यतवाची जेथ प्रचीती। तेथे कर माझे जुळती.

अशा दिव्यत्वाची प्रचीती आपल्या आईवडिलांच्या ठिकाणी आलीच पाहिजे, त्यांच्या प्रती कृतज्ञताभाव असलाच पाहिजे. कसं असतं, जो आपल्या आईवडिलांप्रती कृतज्ञ असेल, गुरुप्रती नम्र असेल तसं तो घरादारांप्रती आस्था ठेवू शकेल आणि जो घर नीट सांभाळू शकतो तोच मग समाजासाठी, देशासाठी काही करू शकेल.

दुर्दैवाने तसं घडत नाही; खरं तर मागच्या पिढीला वेतन फार कमी होते. तरीपण त्यांनी मुलांना शिकवले (मुलींना पण) स्वतःच्या पायावर उभे केले यांना आता वेतनही भरपूर मिळते. (वडिलांच्या पाचपट) काही जणांना लाखावर वेतन असते. पण ते आई-वडिलांना पैसे देताना विचार करतात. गावाकडे (आई-वडिलांकडे) जातानासुद्धा विचार करतात की, तिकडे गेल्यावर आपल्यालाच खर्च करावा लागेल. अरे पण त्यांनी शिकवलेच नसते तर तुम्हाला एवढा पगार कुठुन मिळाला असता?

मुळसिंचने सहजे। शाखापल्लव संतोषती।

पाणी जर मुळांना मिळालेच नाही तर झाड वाळते. त्याचप्रमाणे तुम्ही आई-वडिलांची सेवा केली नाही तर आयुष्यात समाधानही मिळणार नाही. संसार कृतकार्य होणार नाही.

आणि हे माउलींनी सातशे वर्षांपूर्वी लिहून ठेवलं. सगळ्यात महत्वाचं म्हणजे ज्ञानेश्वरीच्या सुरुवातीलाच लिहिलं. नामदेव महाराज म्हणतात ज्ञानेश्वरीची 'एक तरी ओवी अनुभवावी' किती सत्य आहे ते! या एकाच ओवीत माउलींनी कसे जगावे याचे सार शिकविले आहे.

म्हणोनि जाणतेने गुरू भजीजे। तेणे कृतकार्य होईजे।
जैसे मुळसिंचने सहजे। शाखापल्लव संतोषती।।

**- भाग्यश्री दत्तात्रय कुलकर्णी**

●●●



आधी कधीच न मिळवलेले मिळवण्यासाठी आधी कधीच न केलेले करावे लागेल!

# प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था

**(भाग-५)**

*श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांचेतर्फे मार्च २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'प्राचीन भारतातील वाहतूक आणि परिवहन यांची व्यवस्था' हा श्री. मधुकर गजानन दातार यांचा लघु शोधनिबंध 'दिशा'च्या वाचकांसाठी क्रमशः प्रकाशित करत आहोत - संपादक*

**मानसार**

**(मानसार ग्रंथातील ९ वे प्रकरण)**

'ग्रामलक्षणम्' नगररचना आणि त्यांचे निकष

'वक्ष्येहं ग्रामविन्यासं शास्त्रे संक्षेपतः क्रमात् ।'

यापुढे 'नगर रचना' या विषयांतील माहिति थोडक्यात देत आहे.

दण्डकं सर्वतोभद्रं नन्द्यावर्तं तु पद्मकम् !!१!!

स्वस्तिकं प्रस्तरं चैव कार्मुकं च चतुर्मुखम् ।
एव चाष्टविधं ग्रामं तत्तद्रूपेण संज्ञितम् ।।२।।

दण्डक, सर्वतोभद्र, नन्द्यावर्त, पद्मक, स्वस्तिक, प्रस्तर, कार्मुक, चतुर्मुख अशी आठ प्रकारची नगरे त्यांच्या वेगवेगळ्या आकारमानाप्रमाणे जाणली जातात.

'एकाधिशतान्तं स्यान्नवत्रिंशद्विशालकम् ।
एवं तु दण्डकं प्रोक्तं तस्यायाममिहाच्यते ।।६।।

विस्ताराद्विवद्विदण्डेन वर्धयेद् द्विगुंणान्तकम् ।
यः शुभायादिकर्मार्थं दण्डहीनाधकं तु वा ।।७।।

नगरांच्या रुंदीमध्ये ३९ प्रकारचे भेद आढळतात. त्यांची रुंदी २५ दण्डापासून सुरू होते आणि प्रत्येकी दोन दण्डाने वाढत वाढत १०१ रुंदीपर्यंत वाढत जाते. काही उत्तम गोष्टींचा अंतर्भाव करण्यासाठी अयादी नियमांप्रमाणे १ ते १ १/२ दण्डाने वाढत जाऊ शकते.

वानप्रस्थमिदं प्रोक्तं क्षुद्रदण्डमीरितम् ।

सर्वांत कमी क्षेत्रफळाचे गांव, सेवानिवृत्त - वृद्ध जनांच्या निवासासाठी 'वानप्रस्थ' नगर योग्य आहे असे मानले गेले आहे.

षष्टयेकं दण्डमारभ्य द्विद्विदण्डविवर्धनात्।
सैकार्कत्रिंशतं दण्डात् त्रिशत त्रिदश विस्तृतम् ।।१३।।

युग्मायुग्मं तु दण्डेन सर्वतोभद्रमेव च ।
भूसुरामरयोग्यं स्यात्तदायामविशालकम्।।१४।।

या नगरांची रुंदी ६१ दण्डापासून सुरूहोऊन ३१३ दण्डापर्यंत (सैकार्क अर्क - सूर्य १२, सैकार्क १२+१=१३, सैकार्क त्रिशत ३००+१३) प्रत्येकी दोन दण्डाने वाढत ३१३ पर्यंत वाढू शकते. 'सर्वतोभद्र' नगर पृथ्वीवरील देवतास्वरूप मानवांच्या वसाहतीसाठी योग्य मानले गेले आहे.

नन्द्यावर्तग्राम द्विद्विदण्डविवर्धनम् ।
पञ्चषष्टयधि पंञ्चशतदण्डावसानकम् ।।१५।।

एवं पञ्चद्विशतं विशालं परिकीर्तितम् ।
विस्तारायमस्ततुल्यो धकस्तथा ।।१६।।

विस्तारं द्विद्विदण्डेन वर्धयेदू द्विगुणांतकम् ।
नन्धावर्तमिदं प्रोक्त वस्तव्यं देवभूसुरैः ।।१७।।

'नंद्यावर्त' प्रकारच्या ग्रामाच्या रुंदीमध्ये २०५ (दोनशे पाच) प्रकार आहेत. त्यांची रुंदी १५६ दण्डापासून सुरू होऊन प्रत्येकी दोन दण्ड याप्रमाणे वाढत ५६५ दण्डापर्यंत वाढू शकते. लांबी ही रुंदीच्या दुप्पट असते.

'नद्यावर्त' ग्रामांत प्रमुखतः देवतांची मंदिरे आणि देवतातुल्य मानवांची  वस्ती असते.

अथातः पद्मक ग्रामलक्षणमुच्यते ।
''शतदण्डं समारभ्य द्विद्विदण्डविवर्धनात् ।।१८।।

एकसहस्त्रदण्डान्तं विस्तारस्तत्समो मतः।
परमाधिक पञ्चचतुःशतं विशालकम् ।।१९।।

विप्रयोग्यं तथा प्रोक्तं पद्मकमेवं पुरातनैः ।।१९।१''

त्यानंतर 'पद्मक' या ग्रामाच्या क्षेत्रफळाचे वर्णन दिले जात आहे. या गांवाची रुंदी १०० दण्डापासून सुरू होऊन प्रत्येक ग्रामाची रुंदी दोन दोन दण्डानं वाढत जाते. या गावाच्या रुंदीत ४५१ (चारशे एक्कावन्न – पञ्चचतुःशतं परमाधिक) इतके प्रकार असू शकतात. प्राचीन तज्ज्ञांच्या मताप्रमाणे 'पद्मक' हे ग्राम (सुद्धा) विप्रांच्या वसाहतीसाठी योग्य आहे असे मानले गेले आहे.

''अथ स्वस्तिकविन्यासलक्षण मुच्यते।''
एकद्विशतदण्डान्तौ विंशद्दण्डविवर्धनात् ।।२१।।

द्विसहस्तैकदण्डान्तं विस्तारः परिकीर्तितः ।
तस्माद्विशंति दण्डेन वर्धयेत्तत्समाधिकर्म ।।२२।।

तस्यायाममिदं प्रोक्तं स्स्तिकं भूपयोग्यकम् ।।२२ १/२।।

त्यानंतर स्वस्तिक नगराच्या क्षेत्रफळाचा उल्लेख खाली दिला आहे.

या नगरांची रुंदी २०१ दण्डापासून प्रत्येकी २० दण्ड या प्रमाणे वाढत वाढत २००१ दण्डापर्यंत वाढत जाते. 'स्वस्तिक' नगर हे प्रामुख्याने राजे-रजवाडे यांच्या वसाहतीसाठी योग्य असल्याचे मानले जाते.

''अतःपरं प्रस्तरविन्यासलक्षणमुच्याते ।।२३।।

त्रिशतदण्डमारभ्य शतदण्डविवर्धनात् ।
सहस्रद्वदण्डान्तं पस्तरं विस्तृतं भवेत् ।।२४''

आतां 'प्रस्तर' ग्रामाच्या रुंदीबद्दलचे विवरण देत आहे. 'प्रस्तर' नगराची रुंदी ३८० दण्डापासून सुरू होते, ती प्रत्येक नगरासाठी १०० दण्डाने वाढत २००० दण्डापर्यंत जाते.

''सपञ्चषष्टिदण्डादौ द्विद्विदण्डविवर्धनात् ।
युग्मायुग्मं तथा वाडपि दण्डपञ्चशतान्तकम् ।।२५।।

एतत्कार्मुकविस्तारं तस्यायाममिहोच्यते ।
तस्मात्तु शतदण्डेन वर्धयेद् द्विगुणान्तकम् ।।२६

एवंतु वैश्यकानां तु योग्यं तत्कार्मुकं भवेत् ।।२६१/२।।''

'कार्मुकं नगराची रुंदी ६५ दण्डापासून सुरू होते ती सम किंवा विषम संख्येच्या रुंदीने वाढत जात ५०० दण्डापर्यंत वाढू शकते. 'कार्मुक' नगर हे वाणी किंवा व्यापारी जमातीच्या लोकांसाठी उपयुक्त आहे. 'कार्मुक' नगराची लांबी ही रुंदीच्या दुप्पट असते.

''त्रिंशद्दण्डं समारभ्य द्विद्विदण्डविवर्धनात् ।।२७।।

शतदण्डावसानं स्याद्विस्तारं परिकीर्तितम् ।
तत्तद् द्विद्विदण्डेन वर्धयेद् द्विगुणान्तकम् ।।२८।।

एवं चतुर्मुखं प्रोक्तं शुद्राणामेव योग्यकम् ।।२८१/२।।''

'चतुर्मुख' नगराची रुंदी ३० दण्डापासून सुरू होते आणि प्रत्येकी दोन दण्ड रुंदीने वाढत १०० (शंभर) दण्डापर्यंत जाऊ शकते. 'चतुर्मुख' नगर हे 'शूद्र' किंवा सेवकवर्गाच्या वसाहतीसाठी उपयुक्त आहे, असे मानले जाते.

''अथ दण्डकविन्यासं वक्ष्यतेऽधुना ।।४७।।

एतस्मिन् त्रितयं वाडपि पञ्चरथ्यामथापि च ।।
तस्य मूलाग्रयोर्वीभिं न कुर्याद्वाथ कल्पयेत् ।।४९।।

तदेव तिर्यड्गमध्ये डकवीथिं कृत्वा विना तथा ।''

ध्येयावर न पोहोचणे ही शोकांतिका नाही. पोहोचण्यासाठी ध्येयच नसणे ही खरी शोकांतिका आहे.

आतां 'दण्डक' नगराच्या स्थापनेबद्दल आवश्यक त्या सोयी कोणत्या असाव्यात याचे तपशील देत आहे. या 'दण्डक' नगरांत तीन किंवा पाच रस्ते असावेत. या नगरांत एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाण्यासाठी लहान रस्ते नसावेत किंवा करू नयेत. पण एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत मध्ये एकादे वळण आले तरी चालेल. (म्हणजे हा रस्ता पूर्णतया सरळच असावा असे नाही.)

एकद्वित्रिचतुष्पञ्चदण्डं रथ्या विशालकम् ।।५०।।

रथादी वाहने जाण्यासाठी रस्त्याची रुंदी १ दण्ड, २ दण्ड, ३ दण्ड, ४ दण्ड किंवा पाच दण्डापर्यंत ठेवली तरी चालेल.

मध्यरथ्यावृत्ता वीथी सममेवविधीयते
अन्येषां चान्तरथ्यानां वा तत्समं तु विधीयते ।।५१।।

या नगराच्या मध्यभागातून जाणाऱ्या मुख्य रस्त्याला वळसा घालणाऱ्या सर्व रस्त्यांची रुंदी वर उल्लेख केल्याप्रमाणेच असावी. इतर रस्त्यांची रुंदीसुद्धा वरीलप्रमाणेच किंवा थोड्याफार फरकाने कमी किंवा थोडी अधिक असावी.

''मूलाग्रयोर्द्विरथ्या च पक्षमेकं तथाश्रयम् ।
मुख्या वीथी द्विपक्षा स्याद् गृहतारं त्रिदंण्डकम्''।।५२।।

नगराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकाकडे जाणाऱ्या दोन रस्त्यांना (नगराच्या मध्यभागातून) एक पदपथ असावा. पण नगरांतील मुख्य रस्त्याला मात्र दोन पादचारी पथ असावेत.

''एतद्दण्डकमित्युक्तं भूसुराणां तु योग्यकम् ।।५७।।''

असे नगर 'दण्डक' या नावाने ओळखले जाते. आणि देवतातुल्य मानवांसाठी (विप्रांसाठी किंवा इतर सज्जन व्यक्तींसाठी) निवासास योग्य आहे असे मानले जाते.

''चतुर्विंशतिसङ्घश्चेद्यतीनां ग्रामयोग्यकम् ।।५९१/२।।''

चोवीस (किंवा त्याहून अधिक) संन्यासी यांच्या निवासासाठी एका लहान नगराची योजना करावी.

''एतत्तु नदीतीरे वा. पुरमेतत्प्रकथ्यते ।।६०''

असे नगर नदीकिनाऱ्यावर असल्यास त्याला 'पुर' असे संबोधले जाते.

''पञ्चाशद्दीक्षितानां तु नगरं प्रशस्यते ।।६०१/२।।''

जेथे पंचवीस दीक्षित –ज्यांना महान पंडितांकडून शिक्षण प्राप्त झाले आहे असे एकत्र रहात असलेल्या वसतिस्थानाला 'नगर' असे संबोधावे.

''अष्टोत्तरं च पञ्चाशद्गृहस्थानां त मङलम् ।।६१।।

विकर्रिशतसङ्घैश्च कोष्ठमेवं प्रकथ्यते ।''

जेथे अठ्ठावन्न नागरिकांची वस्ती आहे त्या वस्तीला मंगळ म्हणावे आणि शंभर जणांची वस्ती असेल तर त्यास 'कोष्ठ' म्हणावे.

''सर्वतोभद्रविन्यासलक्षणं वक्ष्यतेडधुना ।।६३।।

चतुरश्रसमाकारं मण्डूकं पदविन्यसेत् ।
अथवास्थण्डिलं वाऽपि मध्ये य तद् बह्ममण्डलम् ।।६४।।''

'सर्वतोभद्र' नगराचे वर्णन आता देण्यात येत आहे. असे नगर चौकोनी असावे किंवा त्याचा आकार 'मण्डूक' किंवा यज्ञभूमिसारखा पण असावा आणि अशा नगराच्या मध्यभागी एक मंदिर असावें.

''नन्धावर्तस्य विन्यासलक्षणं वक्षतेडधुना ।''

'नन्धावर्त' नगराच्या स्थापनेच्या निकषांबद्दलचे आतां यापुढे वर्णन करण्यांत येत आहे.

''प्राचीरथ्योत्तराभ्यस्थ दक्षिणायतनिर्गमम्''।।९११/२।।

---

योजना तयार करण्यासाठी खर्च केलेले एक मिनिट ती योजना अंमलात आणताना दहा मिनिटे वाचवते!

पूर्व बाजूचा रस्ता हा उत्तरेकडून दक्षिणेकडे जातो.

''दक्षिणविथी पूर्वादिपश्चिमायत निर्गमम्''।।९२१/२।।

दक्षिण बाजूचा रस्ता पूर्व दिशेहून निघून पश्चिम दिशेकडे जातो (१)

''पश्चिमवीथी दक्षिण्यादुत्तरायत निर्गमम्''।।९२।।

पश्चिम बाजूस जाणारा रस्ता दक्षिण दिशेकडून उत्तरेकडे जातो.

''उदग्वीथी प्रतीच्यादित पूर्वायतनिर्गमम्''।।९३१/२।।

उत्तरेस जाणारा रस्ता पश्चिमदिशेहून सुरू होऊन पूर्व बाजूस त्याचा शेवट होतो.

''नन्द्यावर्तवीथीमेवमुक्तं विचक्षणैः''।।९३।।

'नन्द्यावर्त' नगरातील रस्त्यांबद्दलचे वरील विचार हे त्या क्षेत्रांतील तज्ज्ञांनी व्यक्त केलेले आहेत.

''दक्षिणोदभ्दयोर्वापि प्राक्प्रत्याग्वितयोरपि''।।९४।।

अंतर्वीथीनां मूलाग्रौ चैकपक्षं प्रयोजयेत् ।
पार्श्वयोश्च द्विविधं स्यादू द्विपक्षमुक्तं पुरातनैः ।।९५।।''

(नन्द्यावर्त नगरात) एक पादचारी रस्ता (नगराच्या) आरंभापासून ते नगराच्या शेवटच्या भागापर्यंत, दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणाऱ्या आतील रस्त्याच्या दोन्ही बाजूस असावा. तसेच पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणाऱ्या नगराच्या (आतील) मध्यभागातील रस्त्यांच्या दोन्ही बाजूस देखील पादचारी रस्ते असावेत, असे पूर्वीपासून जाणकार लोक म्हणत आले आहेत.

''एवं बाहयवीथि स्यादंतर्वीथिरिहोच्यते ।।९५१/२।।''

याप्रमाणे बाहेरचे रस्ते असावेत. आता नगराच्या मध्यभागातील रस्त्याचे विवरण देण्यात येत आहे.

''आयते दीर्घरथ्या स्याद्विस्तारे दीर्घमेव च ।।९६
एकत्रिपञ्चसप्तयोर्वीथ्याः पूर्वद्विपक्षयुक् भवेत् ।।९६१/२।।''

नगरांतील (मुख्य) रस्ते लांबीला आणि रुंदीला प्रशस्त असावेत. यापैकी, एक, तीन, पाच किंवा सात रस्त्यांना प्रारंभापासून शेवटापर्यंत दोन पादचारी पथ असावेत.

''एकद्वित्रिचतुष्पञ्चमार्गं वा परिकल्पयेत् ।।९७।।
एवं बहिर्गतं मार्गं तत्र पक्षं न कारयेत् ।।९७१/२।।''

(परिस्थितीनुसार, घरांच्या रचना, मंदिर परिसर यांचा विचार करून) एक, दोन, तीन, चार किंवा पाच लहान रस्ते करणे (मोठे रस्ते करण्यापेक्षा) अधिक चांगले. नगराच्या बाहेरून जाणाऱ्या रस्त्यांना पादचारी पथ मात्र असू नयेत.

''महामार्गं तु सर्वेषां वीथीनां कर्करीकृतम् ।।९८१/२।।''

नगरातील सर्व रस्ते चुनखडी वापरून पक्के करावेत.

मध्येषां तु यथारज्जुः क्षुद्रमार्गं प्रयोजयेत् ।।९९।।

नगरांतील मोठ्या व मध्यम मार्गांना जोडणारे सर्व रस्ते यांची निर्मिती एका रेषेत येईल अशी करावी. (ती वेडीवाकडी किंवा वळणे असणारी नसावी.)

''त्रिचतुष्पञ्चदण्डं वा वीथीनां विस्तृतिर्भवेत्।
षट्सप्ताष्टदण्डं वा नन्दपङ्क्तीषुभानुषु ।।१००।।''

या वर उल्लेख केलेल्या रस्त्यांची रुंदी तीन, चार, पाच, सहा, सात, आठ, नऊ (नन्द), दहा (पंक्ती), ११ किंवा बारा (भानु) अशी असावी. यात उल्लेखनीय भाग असा की, या श्लोकांत संख्या देण्याऐवजी काव्यात्म शब्दांची योजना केली आहे. जसे, नन्द–नऊ, पंक्ती–दहा, ईश–रुद्र, (एकादश रुद्र), भानु–सूर्य (सूर्याची बारा नांवे). (क्रमशः)

**– मधुकर गजानन दातार**

अपयश जितके जास्त, यश तितकेच मोठे.

# आषाढातील सण व उत्सव

*आषाढ महिन्यात साजऱ्या केल्या जाणाऱ्या सणांची माहिती देणारा लेख - संपादक*

मागील महिन्यात म्हणजेच ज्येष्ठ महिन्यात आपण वटपौर्णिमा साजरी केली. सर्व सुवासिनींनी हे व्रत करावे असे कथापुराणांमध्ये सांगितले जाते.

हा धार्मिक आधार आपल्या पूर्वजांनी आपल्याला मुद्दाम दिला. परंतु या वटपूजनाच्या मागचा शास्त्रीय आधार असा आहे की, ज्येष्ठ महिन्यात ऊन संपून हळूहळू पाऊस सुरू व्हायला लागतो. अपचन, अतिसार, प्रवाहिका यासारखे त्रास सुरू होतात. या सर्व आजारांवर वडाच्या पारांब्यांचा काढा अतिशय उपयोगी आहे. रक्तपदर, रक्ताराई, घोणा फुटणे, यात होणारा रक्तस्रावही याने कमी होतो. तसेच स्त्री आणि पुरुष वंध्यत्वावर वटक्षीर अतिशय उपयुक्त आहे. तसेच केस चाई लागणे, केस पिकणे या सर्व लक्षणांमध्ये वटजटादीच्या तेलाचा अतिशय चांगला उपयोग होतो. म्हणूनच या वृक्षाविषयी कृतज्ञता म्हणून या वडाची पूजा ज्येष्ठ पौर्णिमेला केली जाते.

त्यानंतर आषाढ महिन्यात येणारे उत्सव म्हणजे आषाढी एकादशी, गुरुपौर्णिमा आणि दिव्याची अमावस्या.

आषाढ शुद्ध एकादशीला देवरायनी एकादशी म्हणतात. ह्या दिवसापासून चातुर्मास व्रताचा प्रारंभ होतो. या दिवसापासून प्रभू चार महिने झोपी जातो अशी कल्पना आहे. ही जुनी पुराणकथा आहे असे वाटते; पण तसे नाही. वर्षा ऋतूत सृष्टीचे सौंदर्य फुललेले असते. मानवाला जीवन मिळते. शेतकऱ्यांची शेतातही मुबलक पीक येते. सगळीकडे आनंदाचे वातावरण असते. म्हणून भगवंताविषयी कृतज्ञता म्हणून माणूस मंदिरात जाऊन भजन, कीर्तन, प्रवचन या माध्यमातून देवाचे गुण गातात. शेतकरी शेतात कष्ट करतात. म्हणून त्यांना त्यांच्या श्रमाचे फळ मिळते. म्हणून देव त्यांना म्हणतो की हे सर्व वैभव, समृद्धी हे तुझ्या कामाचे, परिश्रमाचे फळ आहे. मी तर चार महिने झोपी गेलो होतो. मला काही माहीत नाही.

खऱ्या कर्मयोग्याला याच्यापेक्षा श्रेष्ठ दुसरे कोणते मार्गदर्शन होऊ शकते?

भगवंताची ही झोप आपल्यावरील विश्वासांमुळे असते म्हणून या काळात आपण व्रतनिष्ठ असले पाहिजे म्हणूनच कदाचित चातुर्मासात सर्वाधिक व्रते येत असावीत.

म्हणूनच या काळात अधिक उपास केले जातात. उन्हाळ्यानंतर येणाऱ्या पावसामुळे सृष्टीतील अग्नितत्त्व मंद होते. तसेच आपल्या शरीरातील अग्नीही मंद होतो. त्यामुळे आम्लपित्त, अपचन, अतिसार, प्रवाहिका मलविबंध आम्लात यासारखे पचनाचे विकार होतात. म्हणून या काळात उपास केले जातात. कांदा, लसूण, वांगी यासारखे वर्ज्य केले जातात. लहान हलका आहार घेणे यामागचा उद्देश आरोग्य राखणे आहेच. या सोबतच वर्षा ऋतूत श्रेष्ठ समजले जाणारे बस्ती हे पंचकर्म याच काळात घ्यावे.

**गुरुपौर्णिमा**

आषाढ पौर्णिमा म्हणजेच व्यास पूजेचा दिवस.

---

बंदराच्या ठिकाणी जहाज सुरक्षित असते. पण तिथे ठेवण्यासाठी जहाज बनवले जात नाही.

गुरुपूजन म्हणजे ध्येयपूजन. ध्येयाचे साकार रूप असते. मानवाच्या जीवनात ध्येय येताच संयम येतो. संयमाने शक्ती वाढते. या शक्तीनेच माणूस ध्येयाच्या जवळ जातो. गुरुपौर्णिमेच्या दिवशी गुरूला वंदन करावे. गुरुच्या उपदेशाचे स्मरण करावे. गुरूच्या ग्रंथाचे वाचन करावे, गुरूला वस्त्र आणि दक्षिणा द्यावी. कारण सद्‌गुरू जीवनाची कला शिकवून मानवाला ईश्वराभिमुख बनवतो. सृष्टीच्या ज्ञानाचे दर्शन करतो. अध्यात्मविद्येचे दर्शन करवतो. आपले जीवन सुंदर, निर्दोष, पवित्र बनवून आपल्याला प्रभू चरणाजवळ घेऊन जातो.

म्हणून या दिवशी सद्‌गुरूची पूजा करावी

ब्रह्मानंद परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम्।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षीभूतं।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्‌गुरुं तं नमामि।।

ब्रह्माचा आनंदरूप, परमसुखरूप, ज्ञानमूर्ती, द्वंद्वापासून दूर, आकाशासारखा निर्लेप व सूक्ष्मतत्त्व तू आहेस. हे ईश्वर तत्त्व तूच आहेस. त्याची अनुभूती हेच ज्याचे लक्ष्य आहे. अद्वितीय, नित्य, विमल, अचल, कोणत्याही भावाच्या पलीकडे, त्रिगुणरहित अशा सद्‌गुरूला मी नमस्कार करतो.

गुरुपूजन म्हणजे सत्याचे पूजन, ज्ञानाचे पूजन, अनुभवाचे पूजन. परंतु ह्या काळात असा सद्‌गुरू मिळाला नाही तर 'कृष्ण वन्दे जगद्‌गुरुम्' भगवान कृष्णाला गुरू बनवून त्याने दाखविलेल्या जीवन पथावरून चालणे श्रेयस्कर आहे.

कृष्णाचा गीता संदेश वाचून, समजून त्याच्यावर विचार करून व आचरणात आणून घराघरात घेऊन जायचा संकल्प करायचा. झोपलेल्यांना जागृत करायचे, मेलेल्यांना संजीवनी पाजायची. अशा या गुरूच्या ऋणाचा विचार करून कृतज्ञभावाने त्याचे कार्य करण्यासाठी कटिबद्ध होऊन गुरुपौर्णिमा साजरी करावी.

**दिव्याची अमावस्या**

आषाढातील अमावस्या ही दिव्याची आमावस्या म्हणून साजरी केली जाते. या दिवशी घरातील दिवे स्वच्छ केले जातात. दिव्याची पूजा केली जाते. यात सौभाग्य द्रव्यांसोबतच बाभळीची फुले, दुर्वा, आघाडा वाहिला जातो.

पावसाळा चांगलाच सुरू झालेला असतो. त्यामुळे संधिवात, पाठदुखी, कंबरदुखी सुरू होते. ह्यास बांभूळ अत्यंत उपयोगी आहे. तसेच दमा, खोकला, कॉलरा, पचन विकार, त्वचा रोग, मूळव्याध, नेत्रविकार यात आघाडा उपयुक्त आहे.

दुर्वा - सर्दी, खोकला Antiviral आणि Antibacterial उपयोग होतो. तारुण्यपिटिका, रक्ताल्पता, त्वचारोग, तोंड येणे. पोटातील अल्सर, स्त्रियांच्या शरीरात Harmonal gmbalance, रक्तार्श, मूत्र कृच्छता, अश्मरी, रक्तप्रदर या सर्व विकारांवर दुर्वा उपयुक्त आहे.

अशाप्रकारे आपल्या पूर्वजांनी अध्यात्म आणि शास्त्र यांची सुंदर सांगड घातली आहे.

दिव्याची छोटीशी ज्योत मोठ्या अंधाराला दूर करते. त्याप्रमाणे एकदा का आत्मज्ञानाची ज्योत अंतःकरणात प्रकट झाली तर जीवनातील सर्व प्रकारचा अंधकार नाहीसा होतो.

अंधारातून प्रकाशाकडे जाणे हे मानवाचे ध्येय आहे.

**- डॉ. शैलजा व्यंकट धर्माधिकारी**

•••

निश्चयी माणसाला कोणी थांबवू शकत नाही. अनिश्चयी माणसाला थांबवण्याची गरजच पडत नाही. तो जागेवरून निघतच नाही!

# युकेंडिया...

*विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने २१ ते ३१ मे कालावधित इंग्लंडची सहल आयोजित केली होती. या सहलीत सहभागी झालेल्या एका कॉलेज तरुणाने आपले अनुभव शब्दबद्ध केलेले आहेत – संपादक*

A country where sun never sets... अगदी सर्वार्थाने योग्य ठरणारी ही ओळ इंग्लंडसाठी वापरली जाते. रात्रीचे १० वाजून गेल्यानंतरही कडकडीत उन्हाची तिरीप सर्वांगाला स्पर्श करून जात होती. हे सारं अनुभवण्यासाठीची लगबग ही ४ डिसेंबर २०१८ ला सुरू झाली. मला चांगलंच आठवतंय माझ्या नाटकाचा नागपूरला प्रयोग होता आणि माझ्या मित्राचा मला मेसेज आला की, व्हीपीएम तर्फे ही शैक्षणिक सहल लंडनला जाणार आहे. आधी हसण्यावारी मजेमजेत सगळ्या गोष्टी होत होत्या, पण हळूहळू उत्सुकता निर्माण होत गेली आणि मजेचे रुपांतर वास्तवात होत गेलं. तो काढलेला पासपोर्ट, त्यावर पडणारी पहिल्या व्हिसाची प्रिंट हे सगळं विचार करून अंगावर शहारे, ओठांवर स्मित हास्य आणि डोक्यात असंख्य विचार येत असत.

प्रथम वर्ष कला शाखेची द्वितीय सत्रांत परीक्षा संपली आणि वेध लागले ते परदेशात जाण्याचे.

... आणि तेही शत्रूच्या शिबिरात

आता सर्वच वाचकांना प्रश्न पडला असेल की एवढी उत्सुकता, आनंद असणारा मी अचानक अशी शीर्षकीय ओळ लिहिली! अगदीच सहाजिक आहे. या आत्ता सुजलाम सुफलाम दिसणाऱ्या भारतभूमीचा इतिहास आपल्या सर्वांनाच माहिती आहे. दीडशे वर्ष आपल्यावर राज्य करणारा हा ब्रिटिशांचा देश आणि त्याच्याच देशात आपण चाललो आहोत. जेट एअरवेज बंद पडल्यामुळे झालेला प्रॉब्लेम निस्तरत अखेर २१ मे २०१९ ला दुपारी १ च्या सुमारास पोटभर जेवण करून सहार एअरपोर्टसाठी आम्ही निघालो. आमची पहिली फ्लाईट संध्याकाळी ३.४५ वा. मुंबई ते बाहरेन अशी होती आणि दुसरी फ्लाईट बाहरेन ते लंडन हिथ्रो एअरपोर्ट. निघण्याची वेळ जवळ येत गेली तशी धडधड वाढत होती आणि हसू याचं येत होतं की या दोन्ही फ्लाईटच्या मध्ये जवळपास ६.३० तासांचा वेळ होता. आता या वेळात करायचे काय? तर सरांनी आधीच सांगितलं होत की तुम्ही एक्सप्लोरर व्हा, एक्सप्लोर करा... ते डोक्यात ठेऊन सुरुवात एअरपोर्ट पासून केली. ड्युटी फ्रीमध्ये जाऊन विंडो शॉपिंग केली आणि त्यानंतर बहारेन एअरपोर्टवर डाव रंगला तो दमशेराजचा. धमालमस्ती करत, सहविद्यार्थ्यांशी ओळख वाढवत ते ६.३० तास हसत खेळत पार पडले.

दुसऱ्या फ्लाईटची वेळ झाली. ०६५-BHR-LHR आणि अखेर सकाळी ७.०० वाजता आम्ही त्या सुंदर अशा ब्रिटिश साम्राज्यात जाऊन पोहोचलो. शिस्तबद्धता, शांतता, स्वच्छता आणि आपलेपणा या गुणांनी संपन्न असा हा देश. पोहोचल्यानंतर नेत्रदीप फिटून जावेत असे रस्ते, थंड वातावरण, मध्येच येणारी उन्हाची तिरीप आणि रिपरिप पावसाच्या सरी याने मनात तयार झालेले इंद्रधनुष्य. त्याजागेचे देशाचे वर्णन करावे तेवढे कमीच. रस्त्यावर जरी गाडी नसली तरी केवळ सिग्नल आहे म्हणून गाड्या नियमांचं पालन करत हिरवा सिग्नल होईपर्यंत विराम घेत. लोक झेब्रा क्रॉसिंग वरून

रस्ता क्रॉस करत असत आणि मुख्य म्हणजे कचरा हा कचरा पेटीतच जात असे. समोरचा माणूस जर आपल्याकडे पाहून हसला तर आदराने Good Morning, Good Afternoon असे हसत मुखाने स्वागत करत.

केंब्रिजला पोहोचल्या पोहोचल्या युथ होस्टेल असोसिएशन येथे बॅग्ज ठेवल्या आणि मुंबईकरांची स्वारी निघाली ती सीटी साईटसिइंगला. तिथली ती डबल डेकर हॉप ऑन हॉप ऑफ टूर बस आम्हाला सिटीच्या जवळ जवळ सगळ्याच विशेष आकर्षणांच्या स्थळी नेऊन भविष्यात काय काय पहायचे आहे याची ती थोडक्यात झलक होती आणि अशाप्रकारे या टूरची नांदी झाली.

या सिटी साईटसिइंनमध्ये विशेष आकर्षण जे जाणवलं ते म्हणजे अमेरिकन सिमिट्री. एखाद्या देशाची ताकद किती असू शकेल याचा अंदाज आपल्याला येऊ शकतो. दुसऱ्या महायुद्धातल्या आपल्या शत्रू राष्ट्रामध्ये स्वतःच्या देशाचा एक भू भाग आणि त्यावर २३ मीटर उंच असा फ्लॅग पोल ज्यावर अमेरिकेचा झेंडा अगदी थाटात मिरवत फडकतोय. थोडक्यात आम्ही यु. के. मध्ये जाऊन अमेरिकेच्या जमिनीवर उभे होतो. अविस्मरणीय अनुभव, दृष्य आणि अंगावर काटा आणणारी वास्तववादी कथा.




त्याचबरोबर बस मधूनच फिट्झविलियम म्युझियम, बोटॅनिक गार्डन, ऑल्बर्ट होम, पिटर हाऊस, क्वीन्स कॉलेज, डार्विन कॉलेज असे थोडक्यात पाहिले आणि नंतर प्रत्यक्ष आत जाऊन पाहाणारच होतो, त्यामुळे उत्सुकता वाढतच गेली.

हळूहळू दिवस सरत होते आणि ज्ञानात अधिकाधिक भर पडत चालली होती. असं म्हणतात शिक्षण आणि ज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू आणि याचा प्रत्यय आम्हाला पदोपदी येत होता. बस स्टॅण्ड असो, हॉस्टेलची लॉबी असो, म्युसिअम असो किंवा चलते चलते हसना सिखों सांगणारा निर्जीव पण बोलका रस्ता असो, आगरकर सर आणि डॉ. बेडेकर हे प्रत्येक ठिकाणी मग ते कुठेही असो, त्यांच्याकडून आम्हाला क्षणोक्षणी, प्रत्येक क्षेत्रातलं विशेषतः वैज्ञानिक ज्ञान मिळत होतं. प्रत्येक गोष्ट आम्ही नीट नोंद करून घेत होतो ज्याचा फायदा आता आम्हाला होतोय. रोज रात्री दिवसभराचा थकवा दूर करून पोटभर जेवण करून आम्ही सगळे डॉ. बेडेकरांसोबत डायरी रिडींग सेशनसाठी बसत आणि दिवसभर आम्ही जे फिरलो, पाहिलं ते लिहून त्याचं वाचन आमच्याकडून होत असे. कोणी कितीतरी वेगळ्या गोष्टी पाहिल्या ज्या आमच्याकडून अनवधानाने निसटल्या असतील आणि काही आम्ही पाहिलेल्या अशा गोष्टी कळत होत्या आणि त्या दिवसाची उजळणी होत असे.

ट्रिनिटी कॉलेज, सोमरविल कॉलेज, किंग्ज कॉलेज, फिट्झ विलियम म्युजियम या आणि पाहिलेल्या सगळ्याच स्थळांमधून नव्याने अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. मुख्यतः त्यांची उत्तम शिक्षणपद्धती. प्रत्येक कॉलेजमध्ये एक कॅफे, हॉस्टेलस्, लायब्ररी हे असतंच आणि असायलाच हवं आणि तिथली मुलं प्रामाणिकपणे लायब्ररीमध्ये बसून स्वतःच्या नोट्स काढत आणि जमेल तेवढं ज्ञान घेण्याच्या मागे लागतात. या काही गोष्टी आपण सर्वांनी शिकायलाच हव्यात आणि आणखीन

एक गोष्ट म्हणजे स्वतःच्या देशाचा इतिहास त्यांना माहीत आहे आणि त्याचा अभिमान त्यांना आहे. असं म्हणतात 'जो देश आपला इतिहास विसरला तो देश रसातळाला जायला वेळ लागत नाही' ही देखील गोष्ट आपण शिकायलाच हवी. त्यांच्या इथले प्रत्येक मॉन्यूमेंट्स स्वच्छ, निटनिटकेपणाने ठेवलेले जपलेले आहेत. प्रत्येक म्युझियम मध्ये त्या गोष्टीचा प्रत्यय आम्हाला येत होता.



मी सर्वात जास्त एक्साईटेड होतो, वाट पाहत होतो ती २८ मे ची. सावरकरांचा जन्मदिवस आणि त्याच निमित्ताने सावरकरांचे लंडन मधले घर म्हणजेच श्यामजी कृष्ण वर्मा यांनी बांधलेले इंडिया हाऊस. सावरकरांचा संपूर्ण जीवनक्रम डोळ्यांसमोरून सहज जात होता आणि २८ लाच महाराष्ट्र मंडळ, लंडनमध्ये आम्ही सावरकरांनी लिहिलेले साहित्य, त्यांची काव्य प्रतिभा आम्ही सगळ्या लहान लहान बाल सावरकरांनी सुमेधा बेडेकर मॅडम यांच्या समवेत गीतांचे सादरीकरण केलं आणि डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी साहित्याचे माहीत नसलेले पैलू लोकांसमोर आणले. मी आणि दिव्येश आम्ही सन्यस्त खड्ग या सावरकरांच्या नाटकातील एक नाट्यप्रवेश सादर केला. खरोखरच संपूर्ण कार्यक्रम, ते ऐतिहासिक स्थळ पाहून अंगावर रोमांच उभे राहिले. तो संपूर्ण दिवसच माझ्यासाठी ऐतिहासिक ठरला.



सरते शेवटी पाहिलेले जुने, इतिहास जमा झालेल्या गोष्टी, मॅन्युस्क्रीप्ट्स, कॉईन्स, रहाणीमान या सगळ्याचे दर्शन या संपूर्ण टूर भर आम्हाला झालं. या जगात्, देशात किती जुन्या काळापासून काय काय गोष्टी होत होत्या हे सारंच आपल्याला दिसतं, अनुभवता येतं.

सर्वांगीण विकास ज्याला म्हणतात तो खऱ्या अर्थाने या टूर मधून आम्हा सर्वांचाच झाला. लेखणीला विराम देता देता पटकन सुचलेल्या या काही ओळी...

**प्रथम परदेश दौरा माझा**
**अविस्मरणीय ठरला**
**सौंदर्य अन् आपुलकीने**
**शोक सारा विरला**

**ज्ञान जितके मिळत होते**
**पदरी पाडून घेतले**
**छोट्या छोट्या गोष्टींसाठी**
**जीव सरांनी ओतले**

**धन्य देश अन् धन्य माणसे**
**धन्य शिस्त ती सतत दिसतसे**
**धन्य तयांचा साठा ज्ञानाचा**

**धन्य VPM हा सण आम्हाला नेण्याचा**

**– युवराज विवेक ताम्हणकर**
एस.वाय.बीए.,
जोशी–बेडेकर विद्यालय,
भ्रमणध्वनी : ९८२०३८०७५६

●●●

# मानसिक आजारी व्यक्तींसाठी पुनर्वसन केंद्र एक सामाजिक गरज

*मानसिक आजारांचे प्रमाण सध्या वाढत आहे. या आजारांवर काम करणाऱ्या एका 'सा' (स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन, पुणे) नावाच्या संस्थेची ओळख करून देणारा डॉ. अनिल वर्तक यांचा लेख – संपादक*

शारीरिक अपंगत्वाविषयी अनेकांना माहिती असते. जन्मापासून, लहानपणाच्या आजारपणामुळे किंवा नंतर अपघातामुळे शारीरिक अपंगत्व आलेल्या व्यक्ती आपल्यापैकी अनेकांनी बघितलेल्या असतात. यापैकी सुरुवातीला काहीजणांना शस्त्रक्रियेची तर बहुतेकांना नंतर औषधोपचारांची मदत घ्यावी लागते. परंतु शस्त्रक्रिया आणि औषधोपचार यातून होणाऱ्या सुधारणेला मर्यादा असतात. आणि मग चालू होतो पुनर्वसनाचा दीर्घकालीन प्रवास.

कोणतेही अपंगत्व असो, शारीरिक अथवा मानसिक, त्यावर उपाय योजना चालू झाली की सक्रिय लक्षणे आटोक्यात येतात आणि आजार वाढण्याची प्रक्रिया अथवा डीजनरेशन थांबते. परंतु रुग्णाला पुन्हा त्याच्या पूर्वस्थितीला आणण्यासाठी औषधोपचार पुरेसे नसतात. आजाराच्या कालावधीत अनेक कौशल्यांचा ऱ्हास झालेला असतो. त्यासाठी पुनर्वसनाचे वेगवेगळे मार्ग स्वीकारावे लागतात. प्रत्येक प्रकारच्या अपंगत्वासाठी पुनर्वसनाच्या भिन्नभिन्न सोयी असतात.

मानसिक आजाराच्या बाबतीत औषधे नियमित घ्यायला लागल्यानंतर मानसिक आजारी व्यक्तीची (शुभार्थी) लक्षणे कमी होतात. परंतु आजाराच्या प्रभावामुळे व्यक्तिमत्त्वाची खूपच हानी झालेली असते. ती हानी दूर करण्यासाठी रुग्णाला शारीरिक व मानसिक दृष्ट्या गुंतवून ठेवणे आवश्यक असते. त्याचबरोबर गमावलेली कौशल्ये पुन्हा मिळवण्यासाठी वेगवेगळ्या उपक्रमात शुभार्थीने भाग घेणे आवश्यक असते.

**'सा' च्या पुनर्वसन केंद्राची सुरवात :**

पूर्वीच्या काळी मनोरुग्णालये आणि मानसिक रुग्णांवर उपचार करणारी केंद्रे गावाच्या बाहेर असत. मनोरुग्णालये आणि इतर उपचार केंद्रे अगदी डोळ्यांसमोर देखील नको अशा विचारांमुळे भारतात स्थापन झालेली सर्वच मनोरुग्णालये गावाबाहेर असत. ज्ञानाचे ऑक्सफर्ड विद्यापीठ समजल्या जाणाऱ्या याच पुण्यात पन्नास वर्षांपूर्वीच काय अगदी पंचवीस तीस वर्षांपूर्वी शुभार्थींसाठी अशा प्रकारची व्यवस्था भर वस्तीत असणे एक महाभयंकर अशी गोष्टच समजली गेली असती. मानसिक रुग्णांविषयी असलेले विविध गैरसमज त्याला कारणीभूत होते. पण अशा व्यवस्थेमुळे रुग्णसमाजापासून, कुटुंबापासून तुटलेले रहात असत. त्यांच्या सुधारणेच्या प्रवासातला तो एक मोठा अडथळा होता. आजारातून सुधारणा होण्यासाठी रुग्ण समाजामध्ये राहणे, कुटुंबाबरोबर राहणे अत्यंत आवश्यक असते. आता मनोरुग्णालये आणि पुनर्वसन केंद्रे समाजामध्ये गजबजलेल्या वस्तीतदेखील चालवली जातात. 'सा'च्या पुनर्वसन केंद्राभोवती एक शाळा आहे. समोर हाउसिंग सोसायट्या आहेत. गेल्या काही दशकात उपचारात झालेल्या सुधारणांमुळे, दृष्टिकोनातील बदलांमुळे हा बदल झालेला आहे. रुग्णांची सुधारणा होण्यासाठी या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात.

सुरवातीपासूनच 'सा' ला पुणे महानगर पालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयातर्फे विविध स्तरांवर मदत झाली. पुणे महानगरपालिकेचे तत्कालीन मुख्य आरोग्य अधिकारी

डॉ. प्रमोद धायगुडे आणि कमला नेहरू रुग्णालयातील मनोविकारतज्ज्ञ डॉ. देवेंद्र शिरोळे यांचे सुरवातीपासूनच सहकार्य मिळाले. त्यांच्या सहकार्यामुळेच २००३ सालापासून 'सा' च्या पुनर्वसन केंद्राची कमला नेहरू रुग्णालयात सुरवात झाली.




संस्थेची स्वतःच्या मालकीची वास्तू २००७ साली बांधून झाली आणि केंद्र नूतन वास्तूत स्थलांतरित झाले. 'सा'चे संस्थापक अध्यक्ष डॉ. जगन्नाथ वाणी यांचे नाव पुनर्वसन केंद्राला दिले आहे. त्याकाळी धायरी हा परिसर पुण्याच्या मध्यवर्ती भागापासून लांब समजला जायचा. सुंदर आणि प्रशस्त वास्तू असून देखील सुरुवातीला बराच काळ एकच शुभार्थी असायचा. पुण्यात त्यावेळेला पुनर्वसन ही संकल्पना अजून नवीन होती. औषधे आणि अन्य वैद्यकीय उपचारांशिवाय शुभार्थींमध्ये सुधारणा होण्यासाठी इतर काही गोष्टी असू शकतात यावर लोकांचा विश्वासच नव्हता. परंतु हळूहळू संख्या वाढू लागली आणि आज तीस ते पस्तीस शुभार्थी 'सा' च्या केंद्रात येतात. एका कर्मचाऱ्यापासून सुरवात करून आज 'सा' मध्ये दोन कार्यालयीन कर्मचारी, चार मानसशास्त्रज्ञ, एक सामाजिक कार्यकर्ती (सोशल वर्कर), एक वाहन चालक, एक माळी, एक स्वच्छता कर्मचारी, दोन स्वयंपाक मदतनीस अशी अकरा माणसे काम करीत आहेत. शुभार्थींना गाडीने आणण्याची आणि सोडण्याची व्यवस्था केल्यामुळे पाषाण, पिंपरी, तळेगाव, कात्रज, बावधन, इत्यादी ठिकाणांहून शुभार्थी केंद्राच्या सेवेचा लाभ घेतात.

**पुनर्वसन केंद्राचे फायदे काय?**

औषधांमुळे शुभार्थींची लक्षणे आटोक्यात येतात. परंतु मध्यंतरीच्या आजारपणाच्या कालावधीत नोकरी, शिक्षण अथवा गुंतवून ठेवणारे अन्य उद्योग थांबलेले असतात. आजाराची जाणीव नसल्यामुळे शुभार्थींना या गोष्टी लक्षात येत नाहीत. त्यामुळे त्यांच्या पालकांना त्यांना कसे गुंतवून ठेवावे असा प्रश्न पडतो. लोकांशी संपर्क तुटल्यामुळे रोजच्या व्यवहारात आवश्यक असणारी कौशल्ये कमी झालेली असतात, आत्मविश्वास नसतो आणि बऱ्याच वेळेला सातत्याने काम करण्याची क्षमता गमावलेली असते. अशा वेळेला शुभार्थी घरी राहिला तर सहाजिकच काम नसल्यामुळे आळसात वेळ घालवणे याशिवाय त्याच्याकडे पर्याय नसेल आणि सुधारणेकडे जाण्याचा त्याचा प्रवास खंडित होईल. काही वेळेला रिकामेपणामुळे त्याच्यातील नकारात्मकता वाढू शकेल, लक्षणे वाढू शकतील. पूर्वीच्या काळी जेव्हा संयुक्त कुटुंबपद्धती प्रामुख्याने होती तेव्हा बहुतेक वेळेला अशा व्यक्तीबरोबर वेळ द्यायला, संवाद करायला कोणी ना कोणीतरी असे. परंतु आधुनिक काळाच्या विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये या गोष्टी शक्य नाहीत. शुभार्थीबरोबर बोलायला, संवाद करायला फारसा कोणाला वेळ नसतो आणि म्हणून अशा शुभार्थींना सकारात्मक पद्धतीने गुंतवून ठेवणारे, त्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक क्षमता व सामाजिक सहभाग वाढवण्यासाठी प्रोत्साहन देणारे पोषक वातावरण मिळालेतर शुभार्थींचा सुधारणेकडचा प्रवास सातत्याने चालू राहील. नेमकी रुग्ण आणि कुटुंबीयांची ही गरज 'सा' च्या पुनर्वसन केंद्रातर्फे भागवली जाते.

**शुभार्थींसाठी दिनक्रम :**

आजारपणाच्या कालावधीत शुभार्थी जेव्हा घरी असतो तेव्हा तो/ती आपणहून स्वत:ला गुंतवून ठेवू शकेल अशी परिस्थिती नसते आणि त्याला गुंतवून ठेवता येईल इतका वेळ आणि कौशल्ये कुटुंबीयांकडे नसतात. 'सा' च्या केंद्रात सकाळी १० वाजल्यापासून ते संध्याकाळी ४.३० पर्यंत वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम आखलेले असतात. सकाळी आल्या-आल्या संपूर्ण परिसराला आठ-दहा राउंड मारण्यापासून दिनक्रमाला सुरवात होते आणि मग दिवसभर वेगवेगळ्या उपक्रमात शुभार्थीला गुंतवून ठेवले जाते. केंद्रातील दिनक्रम पूर्वनियोजित असा असतो आणि त्यात वैविध्य असते.

**'सा' च्या पुनर्वसन केंद्रात राबवले जाणारे कार्यक्रम:-**




'सा' च्या पुनर्वसन केंद्रात एकूण २५ प्रकारचे विविध उपक्रम राबवले जातात. या उपक्रमाद्वारे रुग्णाने अथवा शुभार्थीने गमावलेली कौशल्ये काही प्रमाणात का होईना पुन्हा मिळवावीत हा त्याच्या पाठीमागचा उद्देश असतो. शिवणकाम, भरतकाम, रंगकाम, चित्रकला, हस्तकला, नृत्य संगीत, बागकाम, वृत्तपत्र वाचन, पाककला, व्यायाम व योग; तसेच कापणे, शिवणे, रुबिक्स क्यूब, कौशल्य प्रशिक्षण, भाषा प्रशिक्षण, वाद्यवादन आणि अनेक उपक्रम राबवले जातात आणि आवश्यकतेनुसार त्यात भर देखील पडत असते. प्रत्येक उपक्रम राबवण्याची एक विशिष्ट पद्धत असते आणि एक विशिष्ट वेळ प्रत्येक उपक्रमांसाठी राखून ठेवलेला असतो. हे सर्व उपक्रम शास्त्रीय कसोट्यांवर आधारित आहेत आणि भारतात आणि सर्वच देशात ते वापरले जातात. जगभर जरी हे उपक्रम वापरले जात असले तरी भारतीय परिस्थितीला योग्य होतील अशा पद्धतीने ते राबवले जातात. हे सर्व उपक्रम राबवताना, शुभार्थींना समजावून सांगताना 'सा' मधील स्टाफला सोप्या भाषेत ते समजावून सांगावे लागतात. रुग्णांच्या लक्षणांमध्ये चढ-उतार होत असतात. त्यामुळे खूपच संयम ठेवून कर्मचारी वर्गाला काम करावे लागते.

उपक्रमांबरोबरच पुनर्वसन केंद्रात विविध मानसोपचारपद्धतींचा वापर केला जातो. उदाहरणार्थ विवेकनिष्ठ उपचार पद्धती अथवा आर. ई. बी. टी, वर्तनात्मक उपचारपद्धती, बिहेविअरल थेरपी, बोधनिक उपचारपद्धती अथवा सी.बी.टी, व्यवसायाभिमुख उपचार पद्धती, ऑक्युपेशनल थेरपी, समुपदेशन तसेच आवश्यकतेनुसार लैंगिक शिक्षण देखील दिले जाते.

पुनर्वसन ही एक दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. पुनर्वसन केंद्रात मिळणारे इनपुट्स, त्याचबरोबर रुग्णाच्या भोवतालचे वातावरण अर्थात कौटुंबिक आणि सामाजिक वातावरण, रुग्णाच्या आजाराची तीव्रता आणि महत्त्वाचे म्हणजे आलेल्या मर्यादांची रुग्णाला जाणीव असणे आणि त्यासाठी रुग्णाला स्वप्रयत्न करण्याची इच्छा असणे या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. पुनर्वसनाचे रिझल्ट अशा अनेक गोष्टींवर अवलंबून असतात.

'पुनर्वसन केंद्र' ही शुभार्थींसाठी कायमची मुक्कामाची जागा नव्हे. ही जागा शुभार्थींच्या दुबळ्या झालेल्या पंखात बळ देण्यासाठी आहे. एकदा का हे पंख सक्षम झाले की मग शुभार्थींनी त्यांचे-त्यांचे अवकाशच शोधायला पाहिजे, त्यात भरारी घ्यायला पाहिजे.

माणसाला चमकायचं असेल तर स्वतःचा प्रकाश आणि झळकायचं असेल तर स्वतःचे तेज निर्माण करता आले पाहिजे!

आधाराला आणि मार्गदर्शनाला 'सा' आहेच. 'सा' च्या पुनर्वसन केंद्रात येणाऱ्या सर्व शुभार्थींसाठी हे केंद्र एक स्टेपिंग स्टोन अथवा मुक्कामाला पोहोचण्याची एक पायरी आहे याची जाणीव कर्मचारी वर्गाला ठेवावी लागते आणि त्या दृष्टीकोनातून केंद्रातील कार्यक्रमाची आखणी केली जाते.

**'सा' च्या पुनर्वसन केंद्रात प्रवेश देताना कोणत्या गोष्टी बघितल्या जातात?**

कोणताही नवीन शुभार्थी 'सा' मध्ये जेव्हा येतो तेव्हा त्याच्यावर कोणते उपचार सध्या चालू आहेत, आजाराचा कालावधी, लक्षणे, त्यातील चढ-उतार, आजाराची कौटुंबिक पार्श्वभूमी इत्यादी गोष्टींची प्रथम माहिती करून घेतली जाते. त्याची लक्षणे आटोक्यात आहेत याचीही खात्री करून घेतली जाते. इतर शुभार्थींमध्ये मिक्स होण्याच्या दृष्टिकोनातून आणि क्वचित इतरांच्या सुरक्षिततेच्या कारणांसाठी या गोष्टी करणे महत्त्वाचे असते. नवीन शुभार्थीला साधारणपणे तीन-चार दिवस निरीक्षणाखाली ठेवले जाते आणि त्याच्या वागण्यात व बोलण्यात त्रासदायक विसंगती नाही ना ह्याची खात्री केली जाते. बहुतेक वेळेला शुभार्थींना नाकारण्याची वेळ येत नाही.

**पुनर्वसन केंद्रात कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात?**

स्वच्छ जागा आणि परिसर, आनंददायी वातावरण, झाडांचे सान्निध्य, प्रसन्न आणि हसतमुख स्टाफ, भपकेबाजपणापेक्षा स्टाफचा रुग्णांशी वैयक्तिक संपर्क या गोष्टींना कोणत्याही पुनर्वसन केंद्रात महत्त्व असते. अनेक ॲक्टिव्हिटीज घेण्यापेक्षा थोड्याच ॲक्टिव्हिटीज पण चांगल्या पद्धतीने राबवल्या गेल्या तर रुग्णांच्या कौशल्यांमध्ये वाढ होते. 'सा'च्या स्थापनेपासून या सर्व गोष्टी केंद्रात उपलब्ध होतील याकडे कटाक्षाने लक्ष पुरवले गेले आहे.

**स्वयंसेवक- पुनर्वसन केंद्राचा कणा**

'सा'चे एक भाग्य असे की, 'सा'ला सुरुवातीपासून स्वयंसेवक मिळत गेले. केवळ जाण्या-येण्यासाठी आवश्यक इतकेच तुटपुंजे मानधन घेऊन हे स्वयंसेवक 'सा'मध्ये विविध कौशल्ये शिकवण्यासाठी येत असतात. स्वयंसेवकांमुळे केंद्र चालवण्याचा खर्च निश्चित कमी होतो आणि त्याचबरोबर समाजामध्ये 'सा'चे विचार रुजायला मदत होते. इतर खाजगी पुनर्वसन केंद्रांपेक्षा स्वयंसेवकांचा मोठा सहभाग हे 'सा'चे वैशिष्ट्य आहे.

**स्वयंसेवकांचे अनुभव**

पुनर्वसन केंद्रातील उपक्रम जसजसे वाढत गेले तसतसे ते शिकवण्यासाठी त्या त्या विषयातील तज्ज्ञ स्वयंसेवकांची नेमणूक केली. सध्या बारा ते पंधरा स्वयंसेवक स्वखुशीने, आवडीने आणि मुद्दाम वेळ काढून शुभार्थींना प्रशिक्षण देण्यासाठी येतात. या कार्यकर्त्यांना शुभार्थींच्या आजाराची माहिती संस्थेचे इतर स्वयंसेवक व स्टाफ यांच्या कडून दिली जाते. त्यांच्याशी कसे वागावे, कसे वागू नये, आजाराची लक्षणे काय असतात, ती वाढू नये म्हणून कोणती काळजी घ्यावी, याचे प्रशिक्षण वारंवार घेतल्या जाणाऱ्या बैठकांमधून दिले जाते. शुभार्थींवर कुठल्याही कामाची सक्ती न करता त्यांच्या कलाने हळूहळू काम शिकवून करून घ्यायचं असतं. केलेल्या कामाची प्रशंसा करून त्यांना काम करायला उत्तेजन दिल्यास त्यांची कामातली गोडी वाढते. कामात चूक झाल्यास हिडीस-फिडीस न करता, न चिडता, शांतपणे तेच तेच पुन्हा पुन्हा समजून सांगायची तयारी ठेवावी लागते. उपक्रमातील कामामुळे मानसिक व शारीरिक दोन्ही प्रकारचे फायदे होतात. शिवाय समाजामध्ये काम करण्यासाठी आवश्यक असलेली परंतु आजाराच्या कालावधीत 'क्षीण झालेली कौशल्ये' परत मिळवता येतात. काही उपक्रमांतून उत्पन्न देखील मिळते. आजाराची लक्षणे कमी होण्यासाठी या

जर तुम्हाला अफाट आणि अचाट काम करायचं असेल तर, तुमच्या आयुष्यातील सर्वोच्च उद्देश तुमचं ध्येय असू द्या.

सर्व उपक्रमांची मदत होते. या उपक्रमात गुंतून राहिल्यामुळे लक्षणांमध्ये भरकटणाऱ्या शुभार्थींना जगण्यासाठी योग्य दिशा सापडते.

केंद्राच्या मुख्य हॉलमध्ये एकाच वेळी अनेक ॲक्टिव्हिटीज चालू असतात. सुरवातीपासून या केंद्रात सुषमा दातार काम करत आहेत. त्या शिवणकला, संगीत आणि अन्य कौशल्ये शुभार्थींना शिकवतात. दातार मॅडम सांगतात, 'एका चांगल्या कामात स्वयंसेवक म्हणून काम करावे या इच्छेने मी संस्थेबरोबर काम चालू केले. परंतु सुरुवातीला शुभार्थींबरोबर काम जमेल का नाही याबद्दल मला शंका होतीच. परंतु हळूहळू आम्ही शिकत गेलो. पण माझा अनुभव मी सांगते, गेल्या पंधरा वर्षांमध्ये एकही हिंसक तर जाऊ देत पण अडचणीच्या कोणत्याही प्रसंगाला मला तोंड द्यावयाला लागले नाही. त्याच कालावधीत मला बाहेरच्या इतर लोकांकडून मात्र अनेक अप्रिय प्रसंगांना सामोरे जावे लागले. विविध वयोगटाचे आणि क्षमता असलेले शुभार्थी आमच्यासमोर असतात. त्यामुळे केवळ एकदा सूचना देऊन अनेक जण पालन करतील असं काही शक्य नाही. चार-पाच शुभार्थींबरोबर एका वेळेला आम्ही काम करू शकतो. पुनर्वसन केंद्रांमध्ये शुभार्थींच्या तुलनेत स्टाफ आणि स्वयंसेवकांचे प्रमाण जास्त असते याचे हे कारण आहे.'

**पुनर्वसन केंद्राचे फायदे**



'सा' च्या पुनर्वसन केंद्रात अनेक उपक्रम घेतले जातात आणि प्रत्येक उपक्रमाचा काही ना काही फायदा असतो. व्यायामामुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढते. औषधांच्या साईड इफेक्टमुळे वजन वाढले असेल तर ते कमी व्हायला मदत होते. योगा, प्राणायाम, ध्यानधारणेमुळे मन:शांती मिळते, एकाग्रता वाढते आणि एकूण मानसिक स्थिती सुधारायला मदत होते. विविध खेळातून आनंद, उत्साह मिळतो, शरीर लवचिक बनते. चित्रकला, रंगकाम हे निर्मितीक्षम उपक्रम आहेत. कल्पनाशक्तीला वाव मिळतो, सर्जनशीलता वाढते.



किचन ॲक्टिव्हिटीमध्ये वस्तूंची खरेदी करण्यापासून आपण प्रत्यक्ष पदार्थ तयार करेपर्यन्त शुभार्थींचा सहभाग असतो. त्यामुळे अनेक लाभ शुभार्थींना होतात. उदाहरणार्थ- माप लक्षात ठेवणे, पाककला शिकणे, प्रॉब्लेम सॉल्विंग स्किल्स, पैशाचा व्यवहार करणे, समाजात वावरणे इत्यादी. बागकामामुळे निसर्गाच्या सुखद सानिध्याचा अनुभव घेता येतो. शिवणकाम, क्राफ्ट, केटरिंग, झेरॉक्स या उत्पन्नाच्या गोष्टी स्रोत निर्माण करण्याच्या आहेत. शुभार्थींनी जर या गोष्टी शिकून घेतल्या तर ते अंशत: तरी स्वावलंबी होतील. संस्था वेळोवेळी प्रदर्शनात भाग घेते. तिथे शिवणकामाचे वेगवेगळे नमुने उदाहरणार्थ- पर्सेस, शॉपिंग बॅग,

आर्टिफिशल ज्वेलरी, पेटींग केलेल्या बेडशिटस्, काही खाद्यपदार्थ विक्रीसाठी मांडले जातात. त्यांच्या विक्रीतून होणारा आर्थिक फायदा शुभार्थींमध्ये वाटला जातो.



केंद्रामध्ये वेळोवळी व गरज पडेल तेव्हा शुभार्थी व शुभंकरांचे समुपदेशन केले जाते. त्यातून शुभार्थी घरी कसे वागतात, केंद्रात काय काय करतात, याची माहिती एकमेकांना होते व त्यासाठी गरज पडल्यास उपाय शोधले जातात. दर दोन महिन्यांनी पालक सभा होते. पालकांचे विविध प्रश्न असतात, अपेक्षा असतात, सूचना असतात, त्याला वाट करून दिली जाते. थोडक्यात; पुनर्वसन केंद्रामुळे गमावलेली शारीरिक, मानसिक आणि सामाजिक कौशल्ये पुन्हा मिळवता येतात आणि समाजाचा एक भाग होण्यासाठी (mainstraming) आवश्यक असलेली पार्श्वभूमी तयार होते.



**शुभार्थींमध्ये झालेले बदल**

अशोकचे बाबा सांगत होते, ‘पूर्वी अशोक घरी एकटा राहू शकत नसे. पुनर्वसन केंद्रामुळे त्याचा आत्मविश्वास वाढलेला आहे. आम्हाला बाहेर जायचे असेल तर तो घरी राहू शकतो, कोणी घरी आले तर संवाद साधू शकतो. घरच्यांना तो आता किरकोळ कामात मदत करतो– भाजी आणणे, रद्दी देणे अशी लहानसहान कामे तो करू शकतो. वरवर क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टी त्या कुटुंबाच्या दृष्टिकोनातून फार मोठा रिलीफ देणाऱ्या असू शकतात. बऱ्याच वेळेला आपण बरा झालेला रुग्ण आणि अजूनही मानसिक आरोग्य सेवेची गरज असणारा रुग्ण अशा पद्धतीत रुग्णांचे वर्गीकरण करतो. परंतु शुभार्थी मध्ये टप्प्याटप्प्याने होणारे हे बदल हीदेखील मोठी सुधारणा आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. समाजाने आणि कुटुंबीयांनी या गोष्टीचा विचार करून पुनर्वसन केंद्राचा फायदा घेतला पाहिजे.’

शुभार्थींना दिली जाणारी विविध कामे अथवा उपक्रम– त्याची गरज आणि आवड यांचा विचार करून दिले जातात. सुकन्याला म्युझिकची पहिल्यापासून आवड. घरात एकटी गाणं म्हणायची. परंतु सोशल फोबिया हा खूपच. त्यामुळे चारचौघात कधीच गाणं म्हटलं नाही. दोन वर्षांपूर्वी ती केंद्रात आली आणि मग तिची आवड बघून तिला गाण्याचे जास्त सेशन दिले जातात. आज ती कौटुंबिक उपक्रमांमध्ये सहजपणे गाणं म्हणते आणि वाहवा मिळवते.

**समाजाची गरज**

मानसिक आजारी व्यक्तींसाठी असलेल्या पुनर्वसन केंद्रामध्ये रुग्णांच्या तुलनेत कर्मचारी अथवा स्टाफ यांचे प्रमाण खूपच कमी असते. पाच रुग्णांच्या पाठीमागे एक कर्मचारी असे प्रमाण ठेवावे लागते आणि त्यामुळेच पुनर्वसनाची सेवा देण्याचा खर्च वाढतो. ‘सा’ ही संस्था

स्वयंसेवी संस्था असल्यामुळे आणि दानशूर लोकांच्या डोनेशनवर चालत असल्यामुळे 'सा' मध्ये रुग्णांकडून फारच कमी शुल्क आकारले जाते. खाजगी संस्थांमध्ये मात्र नफा हा उद्देश असल्यामुळे भरमसाठ शुल्क आकारले जाते.

भारतामध्ये आजही पुनर्वसन केंद्रांची संख्या मागणीच्या तुलनेत नगण्य आहे. खाजगी व्यावसायिकांकडून नवीन केंद्रे उभारली जात आहेत. त्यांची फी गरीब वर्गालाच काय, मध्यम उत्पन्न गटातील लोकांनादेखील परवडण्यासारखी नसते. 'सा' मध्ये जरी शुभार्थींकडून खूप कमी फी घेतली जात असली तरी समाजातील गरीब वर्गाला ही फी देखील परवडणे शक्य होत नाही. यासाठी समाजातील गरीब वर्गाला परवडेल अशा प्रकारची केंद्रे केवळ पुणे शहरातच नाहीत तर अन्य ठिकाणी विविध भागात व्हायला पाहिजेत. त्यामुळे रुग्णांचा जाण्या-येण्याचा वेळ देखील वाचेल. जागा आणि अन्य बाबतीत मर्यादा येतील. त्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये, अन्य सरकारी रुग्णालयांमध्ये किंवा सार्वजनिक जागीदेखील अशा प्रकारची केंद्रे चालू करता येतील.

ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक प्रयोग केले. त्याच अनुषंगाने पुनर्वसनाची मोठी समस्या लक्षात घेऊन वेगवेगळे प्रयोग करता येतील. उदाहरणार्थ, पुनर्वसनाची काही कौशल्ये पालकांना शिकवता येतील ज्यामुळे घरच्या घरी काही प्रमाणात का होईना पुनर्वसन होऊ शकेल. तसेच कुटुंबीयांच्या मनात जे निरनिराळे गैरसमज असतात ते गैरसमज पुनर्वसनाच्या प्रक्रियेत अडथळा होतात. हे गैरसमज दूर केले आणि पालकांना योग्य मार्गदर्शन केले तर काही प्रमाणात का होईना घरच्या घरीदेखील पुनर्वसन होऊ शकेल.

लहान-लहान खेड्यांतील रुग्णांना, महिलांना स्थानिक परिस्थितीमुळे पुनर्वसनात केंद्रात येता येणार नाही अशा सर्वांना या विविध मॉडेल्सचा अथवा प्रतीमानांचा उपयोग होऊ शकेल. अनेक रुग्ण/कुटुंबीय माहिती नसल्यामुळे अथवा स्टिग्मामुळे केंद्रात येण्यास नाखूष असतात अथवा विचारही करत नाहीत. अशांसाठी केवळ एक दिवसाची विजिट अथवा आठवड्यातले पाच दिवस सतत मोफत सेवा देता येईल की ज्यामुळे अधिकाधिक रुग्णांपर्यंत/पालकांपर्यंत पुनर्वसनाचा विषय पोहोचेल आणि आपल्या वागणुकीत योग्य ते बदल करावयास ते तयार होतील.

'सा'च्या पुनर्वसन केंद्राने अगदी शून्यातून खूप मोठा पल्ला गाठला असला तरी अजूनही समाजाची गरज फार मोठी आहे. पुनर्वसन ही गोष्ट केवळ एका केंद्रापुरती अथवा वास्तुपुरती सीमित नाही. तो एक विचार आहे. त्यामध्ये अंतर्भूत असलेले उपक्रम, रुग्णहक्क राबवण्याच्या पद्धती, तत्त्वे आणि कुटुंबीय/समाज यांच्या भागीदारीची योजना अशा सर्व गोष्टी समाविष्ट आहेत. भारताचा विचार केला तर इतर संस्थांच्या तुलनेत 'सा'ला पुनर्वसन केंद्र सुरवातीलाच उपलब्ध झाले आणि त्यामुळे 'सा'ची पुनर्वसन केंद्राबाबतीत दीपस्तंभ म्हणून काम करण्याची जबाबदारी आहे याचे भान ठेवूनच 'सा' ची वाटचाल चालू आहे...चालणार आहे.

(हा लेख लिहिताना सौ. नीलिमा बापट आणि सौ. कादंबरी कुलकर्णी या 'सा' मधील सहकाऱ्यांची मदत झाली.)

**- प्रा. डॉ. अनिल वर्तक**
उपाध्यक्ष, स्किझोफ्रेनिया अवेअरनेस
असोसिएशन (सा), पुणे
भ्रमणध्वनी - ९५०३७१०८५९
Email : avartakyahoo.com

●●●

विषय किती वाढवायचा, कुठे थांबवायचा व कुठे दुर्लक्ष करायचं हे ज्याला जमते,
तो जगातील कुठल्याही परिस्थितीवर मात करू शकतो!

# अल हमास ते सँटा इग्लेशिया कॅथेड्रल

*स्पेनमधील सँटा इग्लेशिया कॅथेड्रल बॅसिलिका डे ला इनकार्नेसन' या कॅथेड्रल बद्दल लंडनच्या श्री संकेत कुलकर्णी यांचा लेख - संपादक*

सन १५२८. महत्त्वाचं वर्ष. स्पेनमधल्या मालगा शहरातल्या मध्यवर्ती कॅथेड्रलची पायाभरणी सुरू झाली. 'सँटा इग्लेशिया कॅथेड्रल बॅसिलिका डे ला इनकार्नेसन' हे त्याचे नाव. फार मोठी होती ही घटना. का बरं? कारण १५२८ आधी फक्त २५-३० वर्षांपूर्वीच दक्षिण स्पेनची कडव्या मुसलमानी राजवटीखालून सुटका झाली होती. युरोपमधल्या कॅथलिक राजांनी एकजुटीने लढाई करून ही इस्लामी राजवट उलथवून टाकलेली होती. स्पेन आणि मुसलमानी राजवटीखाली? काहीतरीच काय - हा विचार मनात आला असेल तर हे नक्की वाचा.



अरबस्तानातील उम्मायाद खिलाफतीची ही करामत होती. इ स ७११ मध्ये त्यांनी स्पेन जिंकायला सुरुवात केली. ३० एप्रिल ७११ रोजी मोरोक्कोमार्गे हे अरब आणि बर्बर मुसलमान भूमध्यसमुद्रामार्गे दक्षिण स्पेनमध्ये उतरले होते. काही कालावधीतच त्यांनी दक्षिण स्पेन जिंकून घेतला आणि राज्य स्थापन केले. आजही तिथली बरीच नावे मूळ अरबांनी ठेवलेल्या नावांची भ्रष्ट रूपे आहेत. (उदाहरणार्थ: जिब्राल्टर - हे मूळ अरबी 'जेबेल तारिक' (अरबी= 'विजयाचा पर्वत') ह्याचे भ्रष्ट रूप आजही वापरात आहे!)

हा दक्षिण स्पेन त्यांनी तेव्हापासून ते इ. स. १४९२ पर्यंत मुसलमानी राजवटीखाली ठेवला होता. ही राजवट बरीच कडवी होती. १४८५ च्या सुमारास मात्र हे चित्र बदलू लागले. युरोपमधल्या कॅथलिक राजांनी एकजुटीने लढाई करून ही इस्लामी राजवट उलथवून टाकायचे ठरवले. १४८७ मध्येच कॅथलिकांनी मालगा शहर जिंकले. कॅथलिकांनी मुसलमानांना दोन पर्याय ठेवले. एकतर पुन्हा कॅथलिक व्हा किंवा मरायला तयार व्हा. बहुतांश लोकांनी कॅथलिक धर्मात 'घरवापसी' केली. काही तो प्रदेश सोडून पळून गेले. इस्लाम धर्म दक्षिण स्पेनमध्ये जवळपास नाहीसा झाला. लोकांची 'घरवापसी' केल्यावर ह्या कॅथलिक सत्तांची नजर मशिदींकडे वळली. शहराच्या मधोमध 'अल-हमास' मशिद उभी होती. ती पाडून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. आणि त्याच ठिकाणी एक कॅथेड्रल उभारण्याचे ठरवले. हेच ते मालगाचे कॅथेड्रल - ज्याची पायाभरणी १५२८ मध्ये सुरू झाली आणि आजही ते दिमाखात उभे आहे. मग अल-हमासचं काही शिल्लक ठेवलं का त्यांनी? नाही. त्या मशिदीत एका प्रांगणात भरपूर संत्र्यांची झाडं होती. (हे वर्णन चौदाव्या शतकातील अरबी प्रवासी इब्न बतुताच्या प्रवासवर्णनात येतं!) आजही मालगा कॅथेड्रलच्या प्रांगणात ती संत्र्यांची झाडं आहेत इतकीच काय ती त्या जुन्या मशिदीची आठवण!

आनंदात मग्न असणारी, हसणारी माणसं वेगवेगळी दिसतात, पण दुःखाचा चेहरा सारखाच दिसतो. - व. पु. काळे

गंमत म्हणून एक गणित करून पाहू या. दक्षिण स्पेन मुसलमानी गुलामीखाली किती वर्षे होता माहीत आहे? इस ७११ ते १४८७ – म्हणजे सुमारे ७८० वर्षे!! ४० वर्षांची एक पिढी धरली तर सुमारे २० पिढ्या गुलामगिरी. जरा कल्पना करून पहा. आपल्यापैकी कोणालाही आपल्या २० पिढ्यांपूर्वीच्या पूर्वजाचे निश्चित नाव माहीत आहे? शक्यच नाही. मग तेव्हाची संस्कृती कोणाला आठवणार? ही परिस्थिती असतानाही १४९२ नंतर दक्षिण स्पेन पुन्हा आधी होता तसा कॅथलिक झाला. बाहेरून आलेल्या आक्रमकांनी जुलूमाने लादलेला धर्म त्यांनी टाकून दिला. कॅथलिक धर्माच्या झेंड्याखाली देशाची बांधणी सुरू झाली. स्पॅनिश दर्यावर्दी जग जिंकायला निघाले. ह्यानंतरच संयुक्त स्पेनचा एक सागरी महासत्ता म्हणून उदय झाला. इंग्रजांच्या आधी १००-११० वर्षे स्पेनचे जगाच्या समुद्रांवर निर्विवाद वर्चस्व स्थापन झालेले होते.

हेच गणित वेगळ्या प्रकाराने करू या. सध्या चालू वर्ष आहे २०१९. आपण जर ७८० वर्ष मागे गेलो तर वर्ष येतं १२३९. साधारणत: अल्लाउद्दिन खिलजी आणि मंडळींनी भारतावर हल्ला केला तोच काळ. तुघलक, गझनी, लोधी, सुरी वगैरेंची आक्रमणं, ३३० वर्ष मुघल सत्ता (१५२६-१८५८), त्यानंतर ९० वर्षे इंग्रज, आणि त्यानंतरही सुमारे ७५ वर्षे स्वातंत्र्य मिळून – ह्या सगळ्यांची एकूण बेरीज ७८० वर्ष होते. हा इतका काळ दक्षिण स्पेनने फक्त मुसलमानी राजवटीखाली काढला आणि तरीही ती कॅथलिक राजांनी उलथून टाकली. कसं केलं असेल हो त्यांनी हे – आणि ते ही शिवरायांच्या जन्माच्या आधी सुमारे १३० वर्षे – ह्याचा जरा विचार करून पहाच!

मुघलांच्या आणि ब्रिटिशांच्या गुलामगिरीची रडगाणी गाणं आपण आता थांबवलं पाहिजे. एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून उद्याचा उज्ज्वल भविष्यकाळ आपली वाट पहातोय. इतिहासाचा उपयोग हा चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी करायचा असतो – एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यासाठी किंवा एकमेकांचा दुःस्वास करण्यासाठी नव्हे! इतरांच्या इतिहासातूनही आपल्याला बरेचदा शिकता येतं. त्यासाठी डोळे नाही तर नजर लागते, हेच आज आपण दुर्दैवानं विसरत चाललो आहोत. ज्या दिवशी हे आपल्याला उमगेल तो सुदिन!



**मालगा कॅथेड्रल आणि बाहेरची संत्र्यांची बाग**

तळटीप : १५२८ हे वर्ष वाचून आपणा भारतीयांच्या मनात थोडीतरी संशयाची पाल चुकचुकणे अपेक्षित होते. ज्यांच्या मनात चुकचुकली त्यांचे अभिनंदन! पण त्यांच्या मनात ते तसे झाले नसेल तर ते तसे का होणे अपेक्षित होते हे सांगतो. हे वर्ष आपल्याही इतिहासात तसं महत्त्वाचंच होतं. कारण? ह्याच वर्षी बाबराचा अधिकारी मीर ताश्कंदी ह्याने अयोध्येतील रामकोट येथे 'बाबरी मशिदी'चे 'बांधकाम' सुरू केले होते! तिकडे मालगात 'अल-हमास' ची पाळंमुळं खणली जात होती आणि इथे अयोध्येतल्या रामकोटवरच्या रामजन्मभूमीची!

– **संकेत कुलकर्णी,** लंडन

●●●

आपल्या आयुष्यात कोण येणार हे आपल्या हातात नसतं. पण कोण टिकून राहणार हे आपल्या स्वभावावर अवलंबून असते!

## श्रद्धांजली

# गिरीश कर्नाड : श्रेष्ठ लेखक, नट, दिग्दर्शक

*ज्येष्ठ लेखक व नाटककार गिरीश कर्नाड यांचं नुकतंच निधन झालं. त्यांच्या करकीर्दीवर प्रकाश टाकणारा ज्येष्ठ लेखक सुधीर नांदगावकर यांचा लेख एफ एफ एस आयच्या जुलै २०१९ 'महाराष्ट्र वर्तपत्रा'तून साभार - संपादक*

गिरीश कर्नाड यांचे नाटककार म्हणून कर्तृत्व मोठे होते. ययाती, तुघलक, नागमंडळ, हयवदन इ. त्यांची कानडी नाटके अन्य भाषांत भाषांतरीत झाली. नाटकाबरोबरच गिरीश नटही होता. याबरोबरच त्यांचे कन्नड सिनेमांतले कर्तृत्वही उल्लेखनीय आहे. सत्यजित राय यांच्या 'पथेर पांचाली' पासून स्फूर्ती घेऊन कानडीमधला पहिला वास्तववादी चित्रपट 'संस्कारा' त्यांनी लिहिला. यु. आर. अनंतमूर्तींच्या कादंबरीवर तो बेतलेला होता. कर्मठ ब्राह्मणवादाला धक्का देणारा हा चित्रपट होता. गिरीशने त्यात प्राणेशाचार्याची भूमिकाही केली होती. चित्रपटाचे दिग्दर्शक पट्टाभीरामा रेड्डी होते. त्यांची पत्नी स्नेहलताने त्यात प्रमुख भूमिका केली होती. गिरीशने आपल्या चरित्रात म्हणजे ''खेळता खेळता'' मधे लिहिले आहे, 'दिग्दर्शक म्हणून पट्टाभीरामा रेड्डी यांचे नांव असले तरी चित्रपटाची संकल्पना, लेखन इ. बाबतीत मीच पुढाकार घेतला होता. माझ्या समोर आदर्श होता. 'पथेर पांचाली' चा सारा चित्रपट अग्रहारा या ब्राह्मणवस्तीत घडतो. अग्रहाराचे लोकेशन मीच शोधून काढले.' गिरीशने आत्मचरित्रात एक गंमतीदार किस्सा नोंदविला आहे. एके दिवशी शुटिंग चालू असताना घोरण्याच्या आवाजाने त्यात व्यत्यय आला. आम्ही शोध घेतला तेव्हा बाजूच्या खोलीत झोपलेल्या पट्टाभिरामा रेड्डी यांचेच ते घोरणे होते. कर्नाटकातील ब्राह्मण कर्मठ होते. त्याचबरोबर नियम पाळणारे होते. मृत्यूची बातमी समजताच जेवण टाकून उठले, हे दाखवायलाही गिरीश चुकत नाही.



'संस्कारा' चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाने सर्टिफिकेट नाकारले होते. पण तेव्हा ट्रॉब्यूनल होते. निर्मात्यांनी तिकडे अपील केले आणि माहितीमंत्री इंदर कुमार गुजराल यांनी चित्रपट प्रदर्शनाला परवानगी दिली. 'संस्कारा' कन्नडमधे उत्तम चालला. गिरीशने त्यांत प्रमुख भूमिका केल्याने गिरीशचे नांव झाले आणि लेखक म्हणून त्याला यशाची चव चाखता आली. त्यानंतर गिरीशने एक-दोन चित्रपट कन्नडमधे केले आणि 'गोधुली' कन्नड-हिंदीमधे केला. गिरीशचे नांव त्यामुळे भारतभर पोहोचले. श्याम बेनेगल यांच्यामुळे गिरीश हिंदीत आला. बेनेगलांच्या 'निशांत' व 'मंथन'मधे त्याच्या प्रमुख भूमिका होत्या. बेनेगलांच्या 'भूमिका' चित्रपटाचे लेखन तेंडुलकर करत होते. हंसा वाडकरच्या 'सांगत्ये ऐका' या आत्मकथनावर भूमिका आधारित होती. परंतु बेनेगलांशी मतभेद झाल्याने तेंडुलकरांनी भूमिकाचे पटकथालेखन सोडले तेव्हा बेनेगलांनी गिरीश कर्नाड यांची मदत घेतली.

(पृष्ठ क्र.३२ वर)

येणारी प्रत्येक वादळे ही आपल्याला उद्ध्वस्त करण्यासाठी नसतात, तर आपण काय आहोत याची जाणीव करून देण्यासाठी असतात......!

# गिरीश कासारवल्लीवर उत्कृष्ट इंग्रजी पुस्तक

गिरीश कासारवल्ली हे कन्नड दिग्दर्शक महाराष्ट्रात फक्त फिल्म सोसायटी सदस्यांना ठावूक आहेत. बंगालीत सत्यजित राय, मल्याळीत अदूर गोपालकृष्णन त्याप्रमाणे कानडीत जीवनाला जवळ जवळ सिनेमा निर्माण करणारे प्रतिभाशाली दिग्दर्शक असे गिरीश कासारवल्ली यांचे वर्णन करता येईल.

'घटश्राद्ध' (१९७८) या पहिल्याच चित्रपटाने राष्ट्रीय चित्रपट पारितोषिकांत सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे 'सुवर्णकमळ' पारितोषिक मिळवले आणि नंतरच्या २५ वर्षात १५ कानडी व एक हिंदी चित्रपट दिग्दर्शित केले.

गिरीश कासारवल्ली यांच्या चित्रपट कर्तृत्वावर ओ. पी. श्रीवास्तव यांनी संपादित केलेले 'लाइफ अिन मेटॅफोर' हे इंग्रजी पुस्तक दीप्ती नवल (गिरीशच्या हिंदी चित्रपटाची नायिका) हिच्या हस्ते मुंबईत नुकतेच प्रकाशित झाले.

ओ.पी. श्रीवास्तव हे गृहस्थ मुळांत बँकींग व्यवसायात होते. तेथून ते चित्रपटात आले. 'मिस्डकॉल' हा हिंदी चित्रपट बनवल्यानंतर ते डॉक्युमेंटरीकडे वळले आणि गिरीश कासारवल्ली यांच्यावर 'लाइफ अिन मेटॅफोरल' ही ८४ मिनिटांची डॉक्युमेंटरी बनविली आहे. त्यांनीच हे पुस्तक संपादित केले आहे.

पुस्तकात अदूर गोपाल कृष्णन, श्याम बेनेगल, पी. शेषाद्री हे दिग्दर्शक, मैथिली राव, अरुण खोपकर, विद्यार्थी चटर्जी हे चित्रपट समीक्षक, गदा सेसिस, जॉन हुड, हे आंतरराष्ट्रीय चित्रपट अभ्यासक आणि कन्नड लेखक अनंतमूर्ती यांनी गिरीशच्या चित्रपट कर्तृत्वावर लिहिले आहे. त्याखेरीज गिरीशची दोन्ही मुले अपूर्व आणि अनन्या, छायालेखक, संकलक इ. चे लेख आहेत.

एकूणच गिरीशचे चित्रकर्तृत्व, त्याला मिळालेली राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पारितोषिके छोटे जीवन चरित्र इ. सामग्री गिरीशचे कर्तृत्व समजावून घेण्यास उपयुक्त आहे.

अदूर गोपाल कृष्णन आपल्या लेखात लिहितात. 'मला जर कोणी विचारले माझा आवडता दिग्दर्शक कोण? तर मी गिरीश कासारवल्ली असे सांगेन. कलात्मक दर्जाचा गिरीश सातत्याने पाठपुरावा करतो आहे आणि कानडीत खूपच महत्त्वाची कामगिरी करून राहिला आहे.'

समीक्षक मैथिली राव लिहिते 'गिरीश कासारवल्लीना त्यांच्या कर्तृत्वाएवढे श्रेय मिळाले नाही. सतत ते अप्रकाशित राहिले.'

वस्तुत: ५ वेळा सुवर्ण कमळ आणि अनेक पारितोषिके मिळूनही गिरीश कासारवल्लीच्या नावाची धूम माजली नाही. या पुस्तकातील अनेक लेखकांनी ही खंत व्यक्त केली आहे. याचे एक कारण असे असू शकते की, सत्यजित रायप्रमाणे पहिल्याच चित्रपटाने गिरीश आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला नाही. आणि अदूर गोपालकृष्णन प्रमाणे त्याने कानडीत समांतर सिनेमा सुरू केला नाही. कानडीत तो सन्मान गिरीश कर्नाड यांच्या 'संस्कार'ला जातो. आणि तिसरे कारण म्हणजे गिरीशचा लाजाळू स्वभाव. स्वत:ची टिमकी स्वत: न वाजविण्याचा त्याचा सरळ साधा स्वभाव.

अदूर पुढे लिहतो, 'मला माहित आहे गिरीश, मी वगैरे आम्ही एकाकी आहोत. आमच्याकडे 'आम्ही हरलो आहोत' या दृष्टीने पाहिले जाते. भारतीय सिनेमाच्या विराट विश्वात आम्हाला काहीच स्थान नाही.'

अदूरने व्यक्त केलेली खंत स्वत: गिरीशलाही

ना कुणाशी स्पर्धा असावी, ना कुणाच्या पुढे जाण्याची आकांक्षा असावी,
फक्त स्वतःला सिद्ध करण्याची जिद्द असावी.

आहे. कारण एखाद्या व्यावसायिक दिग्दर्शकांच्या चित्रपटाप्रमाणे त्यांचे चित्रपट धो धो चालले नाहीत. अनेक चित्रपट काढूनही त्यांना खूप धनलाभ झाला नाही. फक्त जाणकारांकडून कौतुक झाले. असे असूनही गिरीशने आपल्याला जसा चित्रपट काढायचा तसाच काढला. कोठेही तडजोड केली नाही. पैसा किंवा प्रतिष्ठा मिळो वा न मिळो यामुळे मी चांगल्या माणसाच्या स्नेहात आहे याचे मला समाधान आहे.

'घटश्राद्ध' चित्रपटाचे मूळ कादंबरीकार अनंत मूर्ती म्हणतात, 'गिरीश तत्त्वज्ञ आहे. आदर्शवादी नाही.' श्याम बेनेगल लिहितात, 'सिनेमातील अपप्रवृत्ती विरोधात झगडणारा गिरीश वूसेडर आहे. कानडीत त्याने समांतर सिनेमा एकट्याने सातत्याने निर्माण केला.'

'घटश्राद्ध'चे निर्माते सदानंद सुवर्णा यांनी घटश्राद्धच्या आठवणी सांगितल्या आहेत. 'घटश्राद्ध' प्रकाशित व्हायला ९ महिने लागले. वितरकाने तो २ चित्रपटगृहात प्रकाशित केला. एक आठवडा हाऊसफुल्ल चालला. पण निर्मात्याला पैसे मिळाले नाहीत. सरकारी अनुदान एक लाख मिळाले. उरलेले एक लाख रु. खर्च ८/९ वर्षांनी दूरदर्शनकडून मिळाला.

पुस्तकांतील विविध लेखांतून गिरीशचे व्यक्तिमत्त्व रेखाटले गेले आहे. चित्रपट निर्माण करण्याची त्याची पद्धत, त्याचा अबोल स्वभाव, बोलण्यातील ऋतुता असे असंख्य संदर्भ वेगवेगळ्या लोकांनी दिले आहेत.

उत्कृष्ट पुस्तकात या इंग्रजी पुस्तकाची गणना होईल.

**लाइफ अिन मेटॅफोर**
संपादक : ओ.पी. श्रीवास्तव
पृष्ठे २५०, मूल्य ३९५/- रु.
reelismfilms@gmail.com

**– सुधीर नांदगांवकर**
महाराष्ट्र वार्ता पत्र

(पृष्ठ क्र.३० वरून- **श्रद्धांजली–गिरीश कर्नाड : श्रेष्ठ लेखक, नट, दिग्दर्शक**)

डॉ. जब्बार पटेलानी १९८१मधे आपल्या 'उंबरठा' या मराठी हिंदी चित्रपटांसाठी स्मिता पाटील सोबत गिरीश कर्नाडना प्रमुख भूमिकेत घेतले. गिरीश कन्नड असल्यामुळे मराठी संवाद कसे बोलणार? असा मराठी चित्रपट रसिकांना प्रश्न पडला. परंतु गिरीशचा मराठी भाषेशी बालपणापासून परिचय होता. एकतर बेळगांव, कारवार, धारवाड येथे रहाणारे सारस्वत घरी मराठी वृत्तपत्र आवर्जून घेत असत. शिवाय गिरीशचे वडील माथेरानला बरीच वर्षे पोस्ट मास्तर होते. स्वाभाविकच बालपणापासून गिरीश मराठी बोलत असे. त्यामुळे 'उंबरठा' तले मराठी संवाद बोलणे गिरीशला जड गेले नाही.

गिरीशने निर्माता शशीकपूरसाठी 'उत्सव' हा वसंतसेनावरचा चित्रपट हिंदीत केला. पण देशी प्रेक्षकांना डोळ्यांसमोर ठेवून चित्रपट केल्याने 'उत्सव' चित्रपट फसला. वसंतसेनेची भूमिका अभिनेत्री रेखाने केली होती.

गिरीश कर्नाड लेखक–नट–आणि पुरोगामी विचारवंत होते. त्यांनी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसमधे पुस्तकाचा संपादक म्हणून सुरवात केली. नंतर फिल्म इन्स्टिट्यूटचे संचालक म्हणून पुण्यात काम केले. इंदिरा गांधीनी १९७५ साली आणीबाणी पुकारली म्हणून त्यांनी फिल्म इन्स्टिट्यूटच्या संचालकपदाचा राजीनामा दिला. इंदिरा गांधी १९८० मधे पुन्हा सत्तेवर आल्यानंतर त्यांची नेमणूक लंडनला नेहरू सेंटरचे संचालक म्हणून झाली. अशा या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाला मनपूर्वक श्रद्धांजली.

**– सुधीर नांदगांवकर**
महाराष्ट्र वार्ता पत्र

# जपानी भाषा व संस्कृती

*जपानी भाषा व संस्कृतीवर प्रकाश टाकणारा लेख - संपादक*

भाषा हा तसा आपल्याला नवीन विषय नाही. भाषेचा मूळ उद्देश आपले विचार, आपली मतं व आपल्या भावना इतरांपर्यंत पोहोचवणे. लहानपणी आपल्याला कोणत्या भाषेचं बाळकडू दिलं जातं त्यावर आपली मातृभाषा ठरते. जसं की माती, मायभूमी आणि माय यांचे आपल्यावर थोर उपकार असतात तसेच मातृभाषेचेही असतात, कारण भाषेविना आपण काहीच करू शकत नाही. जर आपण एकमेकांशी संवादच साधू शकलो नसतो किंवा आपली मतं मांडू शकलो नाही तर सारंच कठीण ! म्हणजेच व्यक्त होण्यासाठी आपल्याला भाषेचा आधार मिळतो. या अनुषंगाने विचार केला तर आपल्याला जेवढ्या भाषा येतील तेवढं चांगलंच नाही का ?

ज्या काळात आपण बहुभाषी होऊन आकाशात उंच भरारी घेऊ शकतो, तिथे फक्त एकच भाषा का माहीत असावी? अनेक भाषा अवगत असलेले नेहमीच उत्तम. आपल्या कारकीर्दीत तसेच नोकरी मिळण्यात तर आपल्याला त्याची मदत होतेच, पण फक्त एवढेच नाही! तर दुसऱ्या देशांतील संस्कृती व तेथील माणसांना समजून घेता येते. नवनवीन शब्द, वाक्प्रचार, सुविचार तसेच त्या विशिष्ट देशातील प्रसिद्ध साहित्य यांचीही आपल्या ज्ञानात भर पडते. इंग्रजीतील “More is Merrier” ही म्हण इथे अत्यंत लागू पडते.

म्हणूनच मी जपानी भाषा शिकण्याचे ठरवले. आशियातील सर्वात प्रगत देशाची भाषा शिकावी असे मला वाटले. दुसऱ्या महायुद्धात सारं काही उद्ध्वस्त होऊनही फिनिक्स पक्ष्याप्रमाणे आकाशात भरारी घेणारा जपान देश आणि त्याची संस्कृती, भाषा, लोकं यांना अधिक जाणून घ्यावं असाही माझा उद्देश होता. जपानी आणि मराठी यांमध्ये बऱ्यापैकी साधर्म्य आहे. त्यामुळे मराठीतून जपानी शिकणं तसं सोपं जातं. जपानीमधील एका वाक्याचा उल्लेख मला येथे करावासा वाटतो -

新しい言語は、新たな人生の始まり。

याचा अर्थ असा की, नवीन भाषा म्हणजे एक नवं आयुष्य. जणू काही आपला पुनर्जन्मच ! मला जपानी भाषा शिकत असताना कोणत्या आणि किती नवीन गोष्टी समजल्या त्याबद्दल मी आता सांगते -

पाचव्या शतकापूर्वी बेकजे या साम्राज्याने चाइनीज पद्धतीने चाइनीज लेखन प्रणालीच्या स्वरूपात जपानला साक्षरता दिली होती. या भाषेचा वापर करून, जपानी राजा बु याने ए.डी ४७८ मध्ये लियू साँगच्या सम्राट शुन यांना याचिका सादर केली. बेकजेच्या विध्वंसा नंतर, जपानने चीनच्या विद्वानांना चिनी लिखित प्रणालीबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी आमंत्रित केले. जपानी सम्राटांनी चिनी विद्वानांना अधिकृत पद दिले. जपानी लोकांनी शास्त्रीय चिनी भाषेत लिहिण्यास सुरुवात केली. पुढे ७ व्या शतकात चिनी भाषेतील ध्वनी भाषेचा सिद्धांत हा शुद्ध जपानी कविता आणि शब्दलेखन लिहिण्यासाठी वापरला गेला होता, परंतु अद्यापही काही जपानी शब्द मूळ चिनीध्वनी मध्ये नव्हते. इथेच जपानी भाषेचा ‘एक लिखित भाषा’ म्हणून प्रवास सुरू झाला. ७ व्या ते ८ व्या शतकापर्यंत जपानी लोकांनी चिनी वर्णांचा वापर केला.

---

अनुभवाने एक शिकवण दिली आहे, कुणाच्या चुका उणीवा शोधत बसू नका.
नियती बघून घेईल; हिशोब तुम्ही करू नका.

कालांतराने, लेखन प्रणाली विकसित झाली. चायनीज अक्षरे ज्यांना 'कांजी' असे म्हटले जाते त्याचा वापर चिनी, किंवा जपानी शब्दांमधून एकसारखे किंवा त्याच अर्थाने घेतलेले शब्द लिहिण्यासाठी करण्यात आला. व्याकरणाच्या मूलभूत गोष्टी लिहिण्यासाठी चिनी वर्णांचा वापर केला जातो आणि शेवटी २ लेखनपद्धती तयार झाल्या : हिरागाना आणि काताकाना.

- हिरागाना ही जपानी भाषेतील पहिली व अत्यंत साधी, सोपी आणि सरळ लेखनपद्धती आहे. मराठीप्रमाणे जपानी भाषेमध्ये सुद्धा आ, का, सा, ता, ना, हा, मा, रा अशी वर्णमाला आहे. याचा वापर करून जपानी मध्ये शब्द लिहिले जातात. तसेच कांजी(चायनीज अक्षरे) कशी वाचली जाते हे सांगण्यासाठी बऱ्याचदा कांजीच्या वरही हिरागाना मध्ये त्या कांजीचे वाचन दिले जाते. पहिल्यांदाच भाषेचा अभ्यास करत असताना यामुळे फार मदत होते.

- काताकाना ही दुसरी लेखनपद्धती. याचा वापर परदेशी भाषेतील, म्हणजेच जे मूळतः जपानी नाहीत असे शब्द व नावे लिहिण्यासाठी केला जातो. उदाहरणार्थ, नेहा हे नाव जपानी मध्ये लिहायचे झाल्यास ते काताकाना मध्ये लिहिले जाते.कारण नेहा हे नाव जपान मधले नसून ते परदेशी आहे. अशा प्रकारे या लेखनपद्धतीचा उपयोग केला जातो.

- तिसरी लेखनपद्धती म्हणजे कांजी. इतर दोन पद्धतींशी तुलना केल्यास कांजी त्यामानाने अत्यंत कठीण व गोंधळ निर्माण करणाऱ्या आहेत. कांजी ह्या चायनीज लेखनपद्धतीतून अवलंबिलेल्या आहेत. प्रत्येक कांजीला २ वाचनपद्धती असतात, ज्याला कुनयोमी (शब्दाचे जपानी वाचन) व ओनयोमी (शब्दाचे चायनीज वाचन) असे म्हटले जाते. हिरागाना व काताकाना या दोन शैलींमुळे एकच शब्द २ प्रकारे लिहिणे शक्य झाले. उदाहरणार्थ, 'यामा' हा पर्वतासाठीचा जपानी शब्द आहे. याच्या कांजीचे वाचन दोन्ही पद्धतीने केले जाणार. यामुळे जपानी व चायनीज यांमधील संबंध स्थापित करण्यास मदत झाली. चिनी शब्द आणि त्यांचे उच्चारण चीनच्या वेगवेगळ्या भागांतून, तसेच विविध ऐतिहासिक कालखंडात घेतले गेले होते. आधुनिक जपानी भाषेत अनेक ओनयोमी वाचन होते.

**KANA CHARACTERS**

| | HIRAGANA | KATAKANA |
|---|---|---|
| ha | は | ハ |
| na | な | ナ |
| ta | た | タ |
| ba | ば | バ |
| mi | み | ミ |
| shi | し | シ |
| ru | る | ル |
| ku | く | ク |

Kana characters stand for the sounds of syllables.

ह्या सर्व जपानी भाषेतील अत्यंत मूलभूत गोष्टी आहेत. जपान मध्ये ९९% लोक हे फक्त जपानी भाषाच बोलतात. इतर देशांप्रमाणे येथे इंग्रजी आपले वर्चस्व स्थापन करू शकली नाही. जपानी लोकांनी कधीच आपली भाषा बोलणे सोडले नाही. त्यामुळे तेथील दुकानांत किंवा इतर कुठेही इंग्रजी भाषेतील फलक सापडणे कठीण आहे. जपान मध्ये बौद्ध व शिन्तो धर्म मुख्य आहे.

जपानी भाषेचा अभ्यास करत असताना तेथील लोकांबद्दल, जपानबद्दल आवडलेल्या काही गोष्टी –

जपानी लोकांचे वैशिष्ट्य म्हणजे व्यक्ती कितीही छोटी असो वा कितीही मोठी, पण प्रत्येक व्यक्तीशी बोलताना आदरयुक्त भाषाच वापरली जाते. याशिवाय प्रत्येकाशी बोलताना वापरायचे शब्द,वाक्यांचा प्रकार हेही भिन्न. म्हणजे मी माझ्या समवयस्कांशी बोलताना

डोकं शांत असेल तर निर्णय चुकत नाहीत आणि भाषा गोड असेल तर माणसं तुटत नाहीत.

जे शब्द किंवा जी वाक्य वापरेन, तशीच वाक्य मी माझ्या शिक्षकांशी किंवा इतर कोणत्याही ज्येष्ठ व्यक्तीशी बोलताना वापरणे अयोग्य ठरू शकते. पण आदर मात्र दोन्हीही प्रकारांमध्ये दिसून येतो. तुलना करायचा उद्देश नाही, पण अशी दृश्ये आपल्या भारतात पाहायला मिळणे जरा कठीणच आहे. कारण आपल्याकडे प्रत्येकाशी बोलताना सर्रासपणे एकाच प्रकारची भाषा वापरली जाते. काही जण तर ज्येष्ठांशी बोलतानाही आदरयुक्त भाषा वापरत नाहीत, ही शरमेची बाब आहे.

यानंतर आवडलेली गोष्ट म्हणजे जपानमधील शिस्त. वाहतुकीचे नियम असू देत किंवा आणखी कोणतेही. पण ते त्या नियमांचे काटेकोरपणे पालन करतात. एकानेही जर नियमांचे उल्लंघन केले तर त्यावर त्वरित व कडक कारवाई केली जाते. त्या व्यक्तीला तात्काळ दंड भरपाई करावीच लागते. माझ्या जपानी भाषेच्या शिक्षिका जपानला गेलेल्या असताना त्यांनी सांगितलेला एक प्रसंग येथे सांगावासा वाटतो. एक महिला तिच्या लहान बाळाला घेऊन रस्ता ओलांडण्यासाठी उभी होती. रस्त्यावर कोणीच नव्हते.ती सहज रस्ता ओलांडू शकत होती,पण केवळ सिग्नल असल्यामुळे त्या महिलेने रस्ता ओलांडला नाही. तसेच जपानमध्ये तुम्ही गाडी चालवत असताना गाडीचा एक मर्यादित वेगही निश्चित केलेला असतो.त्या निश्चित वेगाच्या पलीकडे गेल्यास लगेचच शिक्षा होते. हे केवळ आणि केवळ शिस्त असल्यावर आणि कडक कारवाई असतानाच असे होऊ शकते. ही गोष्ट भारतातही लागू करण्यास सुरुवात करावी असे मला वाटते.

याप्रमाणेच, कचरा कधी, कुठे आणि कसा टाकायचा याचेही नियम आहेत. इलेक्ट्रॉनिक कचरा, ओला कचरा, सुका कचरा, पेय, कप इ. प्रकारे कचऱ्याचे विभाजनही केलेले असते. प्रत्येक प्रकारच्या कचऱ्यासाठी एक वार निश्चित केलेला असतो आणि त्याचदिवशी तो कचरा घंटागाडीला दिला पाहिजे. अन्यथा दुसऱ्या दिवशी तुम्ही स्वतः जाऊन तो कचरा त्यांना द्यायचा किंवा तुम्ही कचरा घेण्यास त्यांना बोलावणार असल्यास त्यासाठी वेगळे शुल्क आकारले जाते. असे करायचे नसल्यास त्या कचऱ्याचा पुढील वार येईपर्यंत थांबण्याशिवाय तुमच्याकडे पर्याय नसतो. पण नियम म्हणजे नियम!

तसेच तुम्ही जर तुमच्या पाळीव प्राण्याला फिरायला घेऊन जात असाल, तर त्याने रस्त्यावर घाण केल्यास ती सुद्धा तुम्हीच साफ केली पाहिजे असाही एक नियम आहे, हे तर आपल्यासाठी जगावेगळेच आहे नाही का? पण या सगळ्यामुळेच तो देश स्वच्छ आणि सुंदर राहण्यास मदत होते.

सांगायचं म्हटलं तर अशा अनेक गोष्टी आहेत. पण सर्वात जास्त मनात भरलेल्या गोष्टींपैकी ह्या काही गोष्टी. या शिक्षणामुळे मला हारुकी मुराकामी सारख्या लेखकाची माहिती झाली. हायकू म्हणजे नक्की काय हे समजण्यास मदत झाली. या भाषेच्या एकूण ५ परीक्षा असतात. त्यापैकी आतापर्यंत मी २ परीक्षा दिलेल्या असून सध्या तिसऱ्या परीक्षेची तयारी सुरू आहे. २ वर्षांतच इतकं नवनवीन शिकायला मिळालं आहे की, अजून किती आणि काय काय असेल याबद्दल खूप उत्सुकता आहे. भविष्यात जपान मधील फुजी पर्वताच्या सानिध्यात आणि डोळ्यांना सुखावणारा साकुरा (चेरी फुलांचा बहर) पाहात काही वर्ष तिथे शिकायची इच्छा आहे. कोणतीही परदेशी भाषा शिकणे हे सोपं नाही, पण सतत मेहनत आणि कष्ट घेतल्यास कौशल्य प्राप्त करणेही अवघड नाही. प्रयत्नांती परमेश्वर !

違う言語というのは、違う人生のビジョンである.

( A different language is a different vision of life)

**– गौरी अंबाजी परब**
तृतीय वर्ष– बी.एम.एम.(पत्रकारिता)
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे

•••

---

माणसाची आर्थिक स्थिती कितीही चांगली असली तरीही जीवनाचा खरा आनंद घेण्यासाठी त्याची मनःस्थिती चांगली असावी लागते.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षा २०१९ चा निकाल : १००%**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी - ३७

**ब्राह्मण सेवा संघ आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेतील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी :**

१) ईशान फणसे - प्रथम क्रमांक

२) गार्गी भागवत - दुसरा क्रमांक

३) मृण्मयी गांगल - चौथा क्रमांक

४) श्रेया मोघे - सहावा क्रमांक

५) आबोली शिंदे - सहावा क्रमांक

**टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल : फेब्रु.२०१९**

| इ. | परीक्षेला बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी |
|---|---|---|
| ८वी | १५ | १० |
| ९वी | १४ | १४ |

**सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :**

| इ. | नाव | गुण |
|---|---|---|
| ८वी | ईशान फणसे | ९८ |
| ९वी | श्रिया दाणेकर | ८९ |
| ९वी | आयुष म्हात्रे | ८७ |

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### प्रा. अर्चना प्रभुदेसाई यांना पीएचडी

महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातील प्रा. अर्चना प्रभुदेसाई यांनी डॉ. किशोरी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली "Study of the influence of Sensory



Factors in Purchase Decision of Non - Durable Goods amongst Consumers in Thane District." या विषयावर मुंबई विद्यापीठास आपला प्रबंध सादर केला. त्यांना ११ एप्रिल २०१९ रोजी मुंबई विद्यापीठाची पीएचडी ही पदवी प्राप्त झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### छत्रपती शाहूमहाराज जयंती

महाविद्यालयाच्या इतिहास विभागात प्रा. प्रियांवदा टोकेकर यांनी छत्रपती शाहूमहाराज जयंती निमित्त दि. २६ जून रोजी आपले विचार व्यक्त केले. इतिहास विभाग प्रमुख श्री. सुभाष शिंदे, ग्रंथपाल नारायण बारसे व अन्य प्राध्यापक कार्यक्रमास उपस्थिती होते.

### एन. सी. सी. नेव्हल युनिट व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने स्पर्धा परीक्षा तयारी या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा




महाविद्यालयाच्या एन. सी. सी. नेव्हल युनिट व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने स्पर्धा परीक्षा तयारी या

विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा ३ ते ५ जुलै आयोजित करण्यात आली होती. अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक साबळे यांनी संयोजन केले. २०० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. महाविद्यालयाच्या एन. सी. सी. नेव्हल युनिट व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने स्पर्धा परीक्षा तयारी या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा ३ ते ५ जुलै आयोजित करण्यात आली होती. अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक साबळे यांनी संयोजन केले. २०० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**स्वरांजली : नाट्यगीतांजली संपन्न**

दि. ६ जुलै रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात नाट्यगीतांची एक बहारदार मैफल रंगली. मराठी नाट्यभूमीवरील अवीट गोडीची नाट्यगीतं जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर करत मराठी नाट्यसंगीताला एक आगळीवेगळी नाट्यगीतांजली वाहिली.

कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या स्वरांजली या उपक्रमाअंतर्गत टॅलेंट अकॅडमीने महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

मराठी नाट्यसंगीताला अजरामर करणाऱ्या खाडिलकर, बालगंधर्व, कानेटकर आदी दिग्गजांच्या 'गुंतता हृदय हे, खरा तो प्रेमा, का धरला परदेश' इत्यादी नाट्यगीतांचे गायन महाविद्यालयाच्या स्मृती कुलकर्णी, सुराज सोमण, केतकर, अथर्व चांदोरकर, ईशान भट, शर्वरी बापट यांनी केले. तसेच युवराज ताम्हणकर यांनी खुमासदार निवेदन केले. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर 'अवघे गरजे पंढरपूर' या गाण्याला रसिकांची दाद मिळाली.

विद्यार्थ्यांना अभिजात संगीतासोबत शास्त्रीय संगीत आणि नाट्यसंगीत याची डोळस जाण व्हावी व यातून चांगले गायक व श्रोते घडावे या हेतूने विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या कल्पनेतून स्वरांजली या अभिनव उपक्रमाची सुरुवात झाली. संयोजन प्रा. मुग्धा बापट यांनी केले. कार्यक्रमास बहुसंख्य विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**विज्ञान संशोधन पुरस्कार स्पर्धेत बांदोडकरच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश**

मराठी विज्ञान परिषदेतर्फे आयोजित २०१८ सालच्या 'विज्ञान संशोधन पुरस्कार' स्पर्धेमध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी तीन पैकी दोन पुरस्कार पटकावून बाजी मारली आहे.

तृतीयवर्ष सूक्ष्मजीवशास्त्राच्या कु. स्नेहल पुजारी व कु. लतिका आंचन या विद्यार्थिनिंना 'इलेक्ट्रोफोरेसिसच्या तंत्राने वेगळ्या केलेल्या प्रथीनांच्या अभिरंजनांची नवी पद्धत' या प्रकल्पासाठी परशुराम बाजी आगाशे पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. जयश्री पवार, डॉ. कल्पिता मुळ्ये व डॉ. झहेरा मोमीन यांनी या प्रकल्पासाठी मार्गदर्शन केले.

सूक्ष्मजीवशास्त्र द्वितीय वर्षात शिकणाऱ्या कु. हिमाद्री काले व कु. मनाली नेमन या विद्यार्थिनिंनी 'वर्मिवाश मधील वनस्पतींच्या वाढीसाठी उपयुक्त ठरणारे जीवाणू वेगळे करण्याच्या पद्धतीचा वापर' हा प्रकल्प सादर केला. त्यांना शरद नाईक विज्ञान संशोधन पुरस्कार प्रदान करण्यात आला. कु. सई जोशी व कु. कोमल गवस या विद्यार्थिनिही या प्रकल्पात सहभागी होत्या. डॉ. कल्पिता मुळ्ये व डॉ. जयश्री पवार यांनी प्रकल्पासाठी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती जोपासण्यासाठी जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांना

महत्त्व याला नाही की कोण आपल्या सोबत आहे. महत्त्व याला आहे की गरज पडल्यावर कोण आपल्या सोबत आहे.



प्रथमवर्षापासून प्रकल्पासाठी मार्गदर्शन केले जाते याआधीही विविध राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय प्रकल्प सादरीकरण स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.



**वि. प्र. मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे या अभ्यासकेंद्राला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठची BCA आणि MCA हे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याकरता मान्यता प्राप्त**

वि. प्र. मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे या अभ्यासकेंद्राला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठची BCA (Bachelor of Computer Application) आणि MCA (Master of Computer Application) हे दोन नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याकरता २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षापासून मान्यता प्राप्त झाली आहे.

BCA अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेण्याकरिता कोणत्याही बोर्डामधून कला, विज्ञान आणि वाणिज्य यापैकी कोणत्याही शाखेमधून किमान ४५% गुणांनी १२ वी उत्तीर्ण ही अर्हता आहे. MCA अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेण्याकरिता कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कला, विज्ञान आणि वाणिज्य विद्याशाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि १२ वी मध्ये गणित किंवा संख्याशास्त्र हा विषय असणे आवश्यक आहे.

कला, विज्ञान आणि वाणिज्य यापैकी कोणत्याही शाखेमधून १२ वी नंतर BCA करण्याकरिता मुंबई विद्यापीठामधून अभ्यासक्रम उपलब्ध नाही. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने तयार केलेले BCA आणि MCA हे अभ्यासक्रम कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या अनेक विद्यर्थ्यांकरिता उपयुक्त आहे आणि बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामध्ये BCA आणि MCA हे दोन्ही अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ISO ९००१:२०१५ ने प्रमाणित**

जून २०१९ मध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची सांगता होत आहे आणि दुग्ध शर्करा योग म्हणजे नुकतेच महाविद्यालय ISO ९००१:२०१५ या प्रमाणपत्राने सन्मानित झाले आहे. महाविद्यालयाचे ब्रीदवाक्य (Imparting Quality Education in Science) सार्थ करीत महाविद्यालयाला ISO ९००१:२०१५ प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

ISO ९००१:२०१५ प्रमाणपत्र म्हणजे महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांना, शिक्षकांना, उपक्रमांना, ग्रंथालयाला, प्रशासनाला आणि सोयीसुविधा यांच्या दर्जात्मक कामाला मिळालेली कौतुकाची पावतीच आहे.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी बदलत्या काळाची पाऊले ओळखून विविध विषयांची सुरुवात केली. या महाविद्यालयात पदवी स्तरावर एकूण १३ विषय शिकविले जातात. या व्यतिरिक्त

०५ विषयांमध्ये म्हणजे रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, पर्यावरणशास्त्र, जैवविविधता व वन्य जीव संवर्धन आणि माहिती तंत्रज्ञान या विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षणाची एम.एस.सी. तर ०५ विषयांमध्ये म्हणजे रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र व पर्यावरणशास्त्र या विषयांमध्ये एम.एस.सी. संशोधनाची व पी.एचडी.ची ही सोय आहे. महाविद्यालयातील १३ शिक्षकांना संशोधन करिता मार्गदर्शक म्हणून विद्यापीठाची मान्यता आहे. गेल्या पाच वर्षात २०० हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय जर्नलमधून सादर झाले आहेत.

गेल्या ५० वर्षांच्या कालावधीत महाविद्यालयाला विविध पुरस्कार जाहीर झाले; जसे मुंबई विद्यापीठाचा २००९-१० मधील उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, जागर जाणिवांचा प्रथम व द्वितीय पारितोषिक, नॅक या संस्थेकडून दोन वेळा 'अ' श्रेणी बहाल, डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी या केंद्र सरकारच्या विभागातर्फे स्टार कॉलेज स्कीमकरता महाविद्यालयाची निवड, FIST तर्फे एक करोड रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. केंद्र सरकारतर्फे Centre of Potential Excellence करता महाविद्यालयाची निवड झाली आहे. २०१४ साली आय. एम. सी. रामकृष्ण बजाज नॅशनल क्वालिटी ॲवार्ड ट्रस्ट तर्फे महाविद्यालयाला Quality क्षेत्रातील Commendation Certificate आणि २०१८ साली Milestone Merits Award in Leadership प्राप्त झाले.

महाविद्यालयाच्या या यशात सर्वच आजी व माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सहकारी, यांचा सहभाग आहे. विद्या प्रसारक मंडळाकडून मिळणारे प्रोत्साहन व पाठिंबा यामुळेच नवनवीन उपक्रम राबवणे सोपे जाते. महाविद्यालयाच्या प्राचार्य यांचे अभ्यासपूर्व निरीक्षण व मार्गदर्शन आणि सर्वच आजी व माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सहकारी यांचे सहकार्य यामुळेच हे यश प्राप्त झाले आहे.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा

आमचे महाविद्यालय बहुमोल अशा केंद्रीय लोकसेवा आयोग, २०१९ च्या परीक्षेचे केंद्र होते. सदर परीक्षा २ जून, २०१९ रोजी सकाळ व संध्याकाळ अशा दोन सत्रात पार पडली. प्रभारी प्राचार्या यांनी केंद्र प्रमुखाची भूमिका पार पाडली. महाविद्यालयातील केंद्रावर २८८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

### विद्यापीठ सत्रपरीक्षा व निकाल

सत्र II, IV व VI च्या परीक्षा २८/५/२०१९ ते २०/६/२०१९ या दरम्यान पार पडल्या.

सत्र I आणि III चे निकाल महाविद्यालयाद्वारे विद्यापीठाने दिलेल्या तारखेनुसार २४ जून, २०१९ रोजी जाहीर करण्यात आले. विद्यापीठाने २५ जून, २०१९ रोजी सत्र V चे निकाल जाहीर केले.

सहसंचालक, पनवेल ह्यांच्या कडून महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी ११ जागांची मंजुरी दिली असून, त्यापैकी ९ रिकाम्या जागांसाठी महाविद्यालयाला सध्या NOC ची प्रतिक्षा आहे.

विद्यापीठाने २०१९-२० पासून CBCS ६०% बाह्य आणि ४०% अंतर्गत मूल्यांकन पद्धती विधी अभ्यासक्रमासाठी लागू करण्याचा निर्णय धेतला आहे. सध्या तरी ही मूल्यांकन पद्धती तीनही वर्षास लागू करावी किंवा नाही ह्याबाबत कोणतीही सुचना आतापर्यंत देण्यात आली नाही. परंतु वार्ताहरांच्याद्वारे मिळालेल्या माहितीनुसार विद्यापीठाने सदर मूल्यांकन पद्धती प्रथम वर्षास लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

---

सर्वात जास्त एकटेपणा तेव्हा वाटतो जेव्हा एकांतात बसल्यावर, 'एकटे का बसलाय?' हे विचारणारं सुद्धा कोणी नसतं.

**CDC सभा**

कॉलेज डेव्हलपमेंन्ट कमिटीची सभा शनिवार दिनांक २९ जून, २०१९ रोजी सायंकाळी ५.०० वा. महाविद्यालयाच्या कॉन्फरेन्स रुममध्ये पार पडली.

संचालक उच्च शिक्षण पुणे, यांना दिनांक २९/६/२०१९ रोजी महाविद्यालयाचा रॅगींग विरोधी अहवाल पाठवण्यात आला. महाविद्यालयात रॅगींग संदर्भात एकही घटना नोंदली गेली नाही. आमच्या विद्यार्थ्यांना रॅगींग विरोधी कायद्याच्या संदर्भात शिक्षण देण्यासाठी महाविद्यालय घेत असलेले परिश्रम सदर अहवालात अधोरेखित करण्यात आले आहेत.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**जून २०१९ मधील कार्यक्रम / वार्ता**

१४ जून : प्रा. कांचन यांनी 'अपग्रेड युवर डिजिटल मार्केटिंग स्ट्रॅटेजी युसिंग न्यूरोसायन्स' (Upgrade Your Digital Marketing Strategy Using Neuroscience). या विषयावर आधारित वेबिनारमध्ये सहभाग घेतला.

२१ जून: डॉ. व्ही. एन. ब्रीम्स मध्ये 'आंतरराष्ट्रीय योग दिवस २०१९' साजरा करण्यात आला.





२२ – २३ जून: डॉ. नीतिन जोशी यांनी पुणे येथील इन्डोव्हान्स या संस्थेमध्ये व्यवस्थापन तत्त्वे या विषयावर आधारित दोन दिवसीय सत्राचे आयोजन केले.



२९ जून : प्रा. सिद्धेश सोमण यांनी ब्रीम्सच्या जर्नल क्लबमध्ये 'क्रिप्टोकरन्सीची ओळख' या विषयावर व्याख्यान सादर केले.






अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद म्हणजेच– AICTE या परिषदेशी संलग्न अशा 'इंटर्नशाला' या संस्थेबरोबर डॉ. व्ही. एन. ब्रीम्सने करार केला असून त्याचा फायदा विद्यार्थ्यांना उन्हाळी प्रशिक्षण रोजगार संधी मिळण्यासाठी होणार आहे. तसेच या करारामुळे स्वाभाविक कल चाचणी, इतर प्रशिक्षण संधी आणि अंतिम रोजगार संधींसाठी देखील विद्यार्थ्यांना मदत होणार आहे.

●●●

बी. एड. असे शिक्षणक्रम राबविण्याचा विचार आहे. अशा प्रकारचे अभ्यासक्रम आजमितीस एनसीईआरटीच्या चार शिक्षण संस्थांमध्ये चालू आहेत आणि ते यशस्वी देखील झाले आहेत.

राष्ट्रीय शिक्षण संशोधन संस्थेची निर्मिती ही नवीन धोरणाची एक महत्त्वाची सूचना आहे. अशा संशोधन संस्थेची खरोखरच गरज आहे. शिक्षण महाविद्यालये शिक्षण संशोधन करतील ही अपेक्षा फारशी यशस्वी झालेली नाही. आजच्या घडीला अनेक शिक्षण महाविद्यालये केवळ नावालाच आहेत. त्यांच्याकडून संशोधनाची अपेक्षा करणे योग्य नाही. म्हणून भारतीय शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक असे संशोधन होणे गरजेचे आहे. असा प्रयत्न टाटा मूलभूत संशोधन संस्थेने चार दशकांपूर्वी सुरू केला. या संस्थेत विज्ञान आणि गणित शिक्षणात मूलभूत संशोधन करण्यासाठी १९७४ साली होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली. या संस्थेने या देशातील विद्यार्थी, येथील शाळांमध्ये असलेल्या सुविधा, समाजाचे बदलते स्वरूप या बाबींचा विचार करून अध्यापन पद्धती विकसित केल्या आहेत. या पद्धतीचा देशभर यशस्वीपणे उपयोग केला जात आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा मसुदा जाहीर झाल्यापासून अनेक ठिकाणी चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येत आहे. या सत्रांमध्ये अनेक अनुभवी लोक आपले विचार मांडत असतात. त्यांच्या सूचना आयोगाकडे आणि पर्यायाने सरकारकडे पोहोचविणे आवश्यक आहे. याचे कारण वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेल्या सूचनांचा विचार करून आयोग अंतिम मसुदा तयार करणार आहे. या कामी जास्तीत जास्त शिक्षण आणि सामाजिक संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. विद्या प्रसारक मंडळ ही ठाण्यातील एक पुरोगामी शिक्षण संस्था आहे. या संस्थेने पुढाकार घेऊन ठाणे शहरात नवीन शिक्षण धोरणावर चर्चासत्र आयोजित करावे असे आवाहन मी करू इच्छितो. मानव सं–साधनांचा विकास ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने आत्ताच पावले टाकणे आवश्यक आहे. नाहीतर देशाचा विकास हे केवळ एक दिवास्वप्न ठरेल. या संदर्भात इस्रायल देशातील माझा अनुभव सांगण्यासारखा आहे. बेन गुरियन विद्यापीठाच्या निमंत्रणावरून काही वर्षांपूर्वी मी इस्राएलला गेलो होतो. त्या देशाने अल्पावधीत केलेली प्रगती डोळ्यांत भरण्यासारखी होती. या प्रगतीचे मर्म कशात हे जाणण्याचा मी प्रयत्न केला. तेव्हा माझ्या यजमान प्राध्यापिकेने मला असे सांगितले की, ''आमच्या देशाकडे कोणतीच नैसर्गिक साधनसंपत्ती नाही. आमची खरी संपत्ती म्हणजे आमची मुले. आम्ही आमचे लक्ष त्यांच्या विकासावर केंद्रित केले. आजचे आमचे यश हे याच प्रयत्नाचे फलित आहे.'' मला वाटते आपल्याला देखील मानव संसाधन विकासावर आपले लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. नाहीतर आपण जगाच्या मागे पडू.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

दि
शा
नियमित
वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.